वर्ष ५८ वे । अंक २४३ । पृष्ठे ६ । किंमत २ रूपये। **रविवार, २९ मार्च २०२६**
PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com dainik_satyaprabha epaper.satyaprabha.com

दैनिक सत्यप्रभा
बातम्यांसोबत विचार देणारे

### दोन आठवडे कॅप्टन कूल बाहेर

*__मुंबई :__ आयपीएलचा हंगाम सुरु झाला असतानाच चेन्नई सुपर किंग्ससह भारतीय क्रिकेटमधील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक महेंद्रसिंह धोनी दुखापतीमुळे सुरुवातीचे दोन आठवडे स्पर्धेबाहेर राहणार असल्याचे जाहीर झाल्याने त्याच्या चाहत्यांमध्ये निराशा पसरली आहे. धोनीच्या दुखापतीची अधिकृत माहिती स्वतः सीएसकेने दिली आहे. संघाने आपल्या अधिकृत अकाउंटवर पोस्ट करत सांगितले, की धोनी सध्या काफ स्ट्रेनसाठी रिहॅबमध्ये आहे.*

### बांगलादेशचा माज अखेर उतरला

*__मुंबई :__ आयपीएलच्या प्रसारणावर बंदी घालणाऱ्या बांगलादेशचा माज आयसीसीने अखेर उतरवला आहे. अलीकडे दोन्ही क्रिकेट बोर्डांमध्ये संबंध सुधारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे आयपीएल प्रसारणासाठी आमच्याकडे अद्याप कोणतेही औपचारिक अर्ज आलेले नाहीत. आम्ही क्रीडा आणि राजकारण एकत्र करू इच्छित नाही. कोणताही चॅनेल आयपीएल प्रसारित करू इच्छित असेल, तर विचार करू, असे बांगालादेशने स्पष्ट केले आहे.*

## अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार : मुख्यमंत्री


# भारताच्या मुत्सद्देगिरीमुळे सर्व अडचणींवर मात करू

## राज्यात सर्व महापालिका-नगरपालिका क्षेत्रात गॅस पाईपलाईन

वृत्तसंस्था। **मुंबई**

भारताच्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुत्सद्देगिरीमुळे युद्धाच्या काळातही खूप मोठी आव्हाने नाहीत. पुरवठ्याबाबत काही छोटी आव्हाने येतील. पण, त्यावर आपण मात करण्याचा प्रयत्न करतो आहोत, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला. दरम्यान, इंधन टंचाई किंवा टाळेबंदीबाबत (लॉकडाऊन) चुकीच्या बातम्या आणि अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध राज्य सरकार कठोर कारवाई करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी सर्व पान २ वर



### तीन महिन्यांत 'एलपीजी' बंद होणार?

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थिती आणि जागतिक स्तरावर निर्माण झालेला इंधनाचा तुटवडा पाहता, आगामी काळात घरगुती गॅस सिलेंडरचा (एलपीजी) पुरवठा मर्यादित होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, ज्या ठिकाणी पाईप गॅस (पीएनजी) उपलब्ध आहे, तिथे नागरिकांनी तातडीने जोडण्या करून घ्याव्यात, अन्यथा पुढच्या तीन महिन्यांत तुमचा सिलेंडर बंद होऊ शकतो, असे सूचक वक्तव्य अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी केले.

### गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी अटी शिथिल

राज्यात मोठ्या प्रमाणात महानगर गॅस निगम लिमिटेड पाईपलाईन टाकण्याचे काम करत असून पाईप गॅस लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. कालच एक जीआर काढून सगळ्या महापालिका आणि नगरपालिका क्षेत्रांमध्ये गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी अटी शिथिल केल्या आहेत. गॅस पाईपलाईन टाकल्यानंतर आपल्याकडे पीएनजी उपलब्ध असल्याने एलपीजीची आवश्यकता असणार नाही. शहरांवरील एलपीजीचा भार कमी केल्यास भविष्यात अशी परिस्थिती उद्भवल्यास कुठलीही अडचण येणार नाही, असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

# पाण्याच्या नळाप्रमाणे आता घरोघरी गॅस पाईपलाईन!

## एलपीजीऐवजी पीएनजी पर्याय ; सरकारच्या हालचाली सुरु

वृत्तसंस्था। **मुंबई**

आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनाचा प्रचंड तुटवडा झाला आहे. याच पार्श्वभूमीवर सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. पाणी आणि वीज कनेक्शन जसे मिळते, तसेच आता पीएनजी अर्थात पाईप लाईनने गॅस कनेक्शन मिळणार आहे. एलपीजी गॅस पुरवठ्यावरील ताण कमी करण्यासाठी यासंदर्भातील निर्णय राज्य सरकार घेऊ शकते.

माध्यमांतील वृत्तानुसार, इराण आणि इस्रायल (मध्यपूर्व) मधील युद्धजन्य परिस्थितीमुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या इंधन पुरवठ्यावर परिणाम झाला असून, भारतात एलपीजी गॅसचा गंभीर तुटवडा निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांत एलपीजीचा तुटवडा असल्याने लोकांच्या गॅससाठी रांगा लागल्या आहेत. तर पुढच्या काळात गॅस मिळेल की नाही, अशी शंका असल्याने पान २ वर




### नवी दिल्लीत बैठकांचे सत्र

नवी दिल्लीत शनिवारी विज्ञान भवनात निवासी आणि व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी आणि पीएनजी गॅसचा अधिक चांगला आणि सुलभ पुरवठा उपलब्ध करून देणे, तसेच निश्चित कालावधीत पीएनजी सेवांचा विस्तार करणेबाबत केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर, केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीनंतर पीएनजी गॅसच्या निर्णयाच्या संदर्भात सरकारच्या हालचाली वाढल्या आहेत.

## आंतरराष्ट्रीय

### नरेंद्र मोदींकडून बालेन शाहंना शुभेच्छा



**नवी दिल्ली :** नेपाळमध्ये बालेन शाह यांनी शुक्रवारी पंतप्रधानपदाची धुरा सांभाळल्यानंतर भारत-नेपाळ संबंधांबाबत सकारात्मक संकेत दिले आहेत. त्यांच्या शपथविधीनंतर लगेचच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा देत द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्याची अपेक्षा व्यक्त केली. पंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडियावरून शाह यांचे अभिनंदन करत भारत आणि नेपाळमधील ऐतिहासिक मैत्री अधिक दृढ होईल, असा विश्वास संवादादरम्यान व्यक्त केला.

## संक्षिप्त

### माऊलींच्या पालखीचे आठ जुलैला प्रस्थान

**पुणे :** राज्यातील वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पालखी सोहळ्याचे नियोजन पंढरपूर येथे झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आले. चैत्र वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी संस्थान व प्रमुख महाराज मंडळींच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. आठ जुलैला या पालखीचे प्रस्थान होणार असल्याचे या बैठकीत जाहीर करण्यात आले. यावर्षी पालखी सोहळा एकूण १८ दिवसांचा असणार आहे.

### काँग्रेस-द्रमुकचे जागावाटप निश्चित

**चेन्नई :** तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी द्रमुक आघाडीने जागावाटप जाहीर केले आहे. मुख्यमंत्री एम. के. स्टॅलीन यांनी आज जागावाटपाचा तपशील आणि पक्षाच्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली. एकूण २३४ मतदारसंघांपैकी द्रमुक १६४ जागांवर निवडणूक लढवणार असून, उर्वरित ७० जागा मित्रपक्षांसाठी सोडण्यात आल्या आहेत. काँग्रेसच्या वाट्याला २८ जागा आल्या आहेत.

### यात्रेकरूंची बस उलटून पाच ठार

**भुवनेश्वर :** ओडिशामध्ये यात्रेकरूंना घेऊन जाणारी बस उलटून पाच जणांचा मृत्यू झाला असून ४० हून अधिक जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी १५ जणांची प्रकृती गंभीर आहे. ही बस बरहमपूरहून बलांगीर येथील हरिशंकर मंदिराकडे बरहमपूर भागातील ५५ भाविकांना घेऊन निघाली होती, असे पोलीस म्हणाले.

# झटपट श्रीमंतीचा मोह जीवावर बेतला!

## शिक्षकाची निर्घृण हत्या ; बनावट नोटांच्या रॅकेटचा पर्दाफाश!

प्रतिनिधी। **हदगाव**

हदगाव येथील विवेकानंद माध्यमिक विद्यालयातील शिक्षक गणेश गड्डा (वय ३८) यांच्या हत्येच्या प्रकरणाने धक्कादायक वळण घेतले असून, या गुन्ह्यामागे बनावट नोटांचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची बाब समोर आली आहे. बुलडाणा जिल्ह्यातील चिखली येथे घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणात खामगाव येथील दोन आरोपींना अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली कार आणि मोठ्या प्रमाणात बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.




खामगाव तालुक्यातील बोथाकाजी येथील शेख शाहरुख शेख प्यारु (वय ३१) आणि सुप्रबुद्ध महादेव हिवराळे (वय ३३) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे, जप्त केलेल्या नोटांवर 'चिल्ड्रन बँक ऑफ इंडिया' असा उल्लेख आहे. या बनावट नोटांच्या आधारे लोकांना फसवून पैसे लुटण्याचे जाळे या टोळीने उभारले असल्याचा पोलिसांचा संशय आहे. आरोपींनी पैसे दुप्पट करून देतो असे आमिष दाखवून गणेश गड्डा यांना चिखली येथे बोलावले होते. या व्यवहारासाठी गड्डा हे उंचेगाव येथून भाड्याने कार घेऊन मोठी रोकड घेऊन गेले पान २ वर

# पूरग्रस्त शेतकऱ्यांना नव्याने मदत

## दुधाळ जनावरे, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्याना भरघोस मदत

वृत्तसंस्था। **मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अर्थसंकल्पीय अधिवेशात शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत पीक कर्ज माफीची घोषणा केली. तर जे शेतकरी नियमित कर्ज फेड करतात. त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचे जाहीर झाले आहे. त्यानंतर आज राज्य सरकारने जून ते सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टीच्या नुकसानीपोटी नव्याने मदतीची घोषणा करुन शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

गेल्या वर्षी जून ते सप्टेंबर या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान सोसाव्या लागलेल्या पशुपालकांसाठी राज्य सरकारने मदतीचा नवा आणि सर्वसमावेशक आराखडा जाहीर केला आहे. यापूर्वी मदतीसाठी असलेल्या जाचक अटींमध्ये महत्त्वाचे बदल करून आता सरसकट मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, मृत पावलेल्या जनावरांच्या संख्येवर लावलेली मर्यादेची अट आता शिथिल करण्यात आली असून, नैसर्गिक आपत्तीत दगावलेल्या सर्व जनावरांच्या नुकसानीपोटी सरकारकडून भरपाई दिली जाणार आहे. फडणवीस सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे यापूर्वी मदतीपासून वंचित राहिलेल्या शेकडो पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. केवळ मृत जनावरांसाठीच नव्हे, तर पावसाने कोसळलेल्या किंवा नुकसान झालेल्या पान २ वर

# पोलिसांचाच ६० लाखांचा स्कॅम!

**दोघांना अटक, तर दोन फरार**

प्रतिनिधी। **नांदेड**

कायद्याचे रक्षण करणाऱ्यांकडून कायद्याची पायमल्ली होत असल्याचा धक्कादायक प्रकार नांदेड जिल्ह्यात उघडकीस आला आहे. चक्क पोलीस कर्मचाऱ्यांनीच बनावट आमिष दाखवून एका शासकीय कर्मचाऱ्याला तब्बल ६० लाख रुपयांचा गंडा घातल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ६० लाखांत एक कोटी रुपयांचे सोने देतो, असे आमिष दाखवत चार जणांच्या टोळीने हा डाव रचला. विशेष म्हणजे, या टोळीत दोन पोलीस कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, उर्वरित दोघे अद्याप फरार आहेत. लोहा तालुक्यातील खेडकरवाडी येथील सचिन वालाजी खेडकर (वय २७) हे शासकीय कर्मचारी आहेत. १७ जानेवारी २०२६ रोजी त्यांना पारडी येथे बोलावण्यात आले. तेथे कमी पैशांत जास्त सोने देण्याचे आमिष दाखवून त्यांना ६० लाख रुपये आणण्यास भाग पाडण्यात आले. खेडकर आमिषाला बळी पडले आणि त्यांनी ठरल्याप्रमाणे रक्कम आणली. घटनास्थळी चार आरोपी पोलिसांच्या वेशात उपस्थित होते. त्यांनी खेडकरकडून ६० लाख रुपये घेतले आणि त्यानंतर त्यांना मारहाण करून धमकावले. एवढेच नव्हे, तर बनावट पान २ वर

### राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्षाचा चाकणकरांचा राजीनामा

वृत्तसंस्था। **मुंबई**

अशोक खरात प्रकरणात आरोप झाल्यानंतर अगोदर राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद गमावल्यानंतर आता रुपाली चाकणकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्याकडे सुपूर्द केला आहे. मी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे. तो स्वीकारावा, असे चाकणकर यांनी आपल्या राजीनामापत्रात म्हटले आहे. रुपाली चाकणकर यांनी सोशल मीडियावर राजीनाम्याबाबत एक पोस्ट केली आहे. त्यांनी म्हटले आहे, की, खरात प्रकरणाबाबत पहिल्या दिवशीच मी पान २ वर




## बाजारपेठ

### नोंदणी करूनही विक्री अडकली ; खरेदी केंद्रांवर रांगा

# बारदान्याअभावी हरभरा खरेदी ठप्प

प्रतिनिधी। **नांदेड**

जिल्ह्यात शासकीय हमीभावाने हरभरा खरेदीची प्रक्रिया सुरू असतानाच बारदान्याच्या टंचाईमुळे संपूर्ण यंत्रणा कोलमडल्याचे चित्र समोर आले आहे. एनसीसीएफ, नाफेड तसेच पणन, कृषी पणन महासंघ व व्हीसीएमएफच्या एकूण ६८ खरेदी केंद्रांवर हरभरा खरेदी सुरू होती. मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी हमीभावाने विक्रीसाठी नोंदणी केली होती; प्रत्यक्षात बारदाण्याअभावी खरेदी केंद्रांनी हात टेकल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण झाली आहे.

सध्या अनेक केंद्रांवर खरेदी प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे. हरभऱ्याचे वजनही होत नाही. परिणामी, शेतकऱ्यांना आपला केंद्रांवर थांबावे लागत आहे. वाहनांच्या रांगा लागल्या असून, परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. वाढत्या वाहतूक खर्चामुळे आणि मजुरीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडत आहे. नायगाव तालुक्यातील मोकासदरा येथील खरेदी केंद्रावर २३ मार्चपासून हरभरा खरेदी बंद आहे. अनेक शेतकरी आपल्या वाहनांसह केंद्रावरच मुक्काम करत आहेत. वेळ आणि पैशाचे मोठे नुकसान सहन करत असतानाही त्यांना कोणताही ठोस दिलासा मिळत नाही. जिल्ह्यातील इतर खरेदी केंद्रांवरही असेच चित्र आहे. नोंदणीची मुदत संपण्यापूर्वीच खरेदी बंद पडल्याने शेतकरी संभ्रमात सापडले आहेत. हमीभावाने माल विक्री होईल की नाही? असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला आहे.



### आर्थिक नुकसानीची भीती

दिवसभर रांगेत उभे राहूनही काही शेतकऱ्यांना निराश परत जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने बारदाना उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. अन्यथा, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाकडून लवकरच तोडगा काढला जाईल, असे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात परिस्थितीत सुधारणा झालेली दिसून येत नाही.

# हुथी-हिजबुल्लाहची इराणच्या बाजूने युद्धात एन्ट्री ; आखातात अण्वस्त्र वापराची भीती वाढली !

वृत्तसंस्था | वॉशिंग्टन/तेहरान



इराण-इस्रायल युद्धाच्या २८ दिवसांनंतर, आता हुथी बंडखोर आणि हिजबुल्लाह या दोन्ही संघटना सामील झाल्याने युद्धात अण्वस्त्रांचा धोका वाढल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. टाइम्स ऑफ इस्रायलमधील एका वृत्तानुसार, येमेनमधील इराण-समर्थित हुथी बंडखोरांनी दक्षिण इस्रायलमधील बेअरशेबा शहर आणि आसपासच्या भागांना लक्ष्य करून दोन हजार किमी अंतरावरून एक बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागले. क्षेपणास्त्र डागल्याचे लक्षात येताच हवाई संरक्षण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आणि हवेतच हा धोका नष्ट करण्यात आला. या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

सध्याच्या युद्धादरम्यान येमेनकडून इस्रायलवर झालेला हा पहिलाच हल्ला असल्याचे मानले जात आहे. तथापि, हुथी बंडखोरांनी अद्याप या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. यापूर्वी, गाझा युद्ध सुरू झाल्यानंतर नोव्हेंबर २०२३ मध्ये हुथी बंडखोरांनी इस्रायली जहाजे आणि नौदलाच्या नौकांवर हल्ले केले होते. इस्रायलने त्याला प्रत्युत्तर दिले होते. तथापि, ऑक्टोबर २०२५ मध्ये हमास आणि इस्रायल यांच्यात झालेल्या युद्धविरामानंतर हुथी बंडखोरांनी इस्रायलवरील हल्ले थांबवले. दुसरीकडे, अबु धाबीच्या सरकारी माध्यम कार्यालयानुसार, रोखण्यात आलेल्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या अवशेषांमुळे पाच भारतीय नागरिक जखमी झाले आहेत. यापूर्वी, शहराच्या खलिफा इकॉनॉमिक झोनमध्ये क्षेपणास्त्राच्या अवशेषांमुळे दोन ठिकाणी आग लागल्याचे वृत्त होते, जी विझवण्यासाठी पथके काम करत होती. येमेनमधून इस्रायलच्या दिशेने डागलेल्या क्षेपणास्त्रांमुळे सध्याचा संघर्ष वाढू शकतो. इस्रायली लष्कराने दावा केला आहे, की हुथी बंडखोरांनी येमेनमधून क्षेपणास्त्रे डागली आहेत. तथापि, येमेनच्या हुथी बंडखोरांनी अद्याप या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. इतर देश या संघर्षात सामील झाले किंवा त्यांच्या मित्र राष्ट्राविरुद्ध लाल समुद्राचा वापर केला, तर ते लष्करी हस्तक्षेप करू शकतात असा इशारा हुथी बंडखोरांनी दिला आहे. हुथी उघडपणे या संघर्षात सामील झाले, तर हा संघर्ष संपूर्ण प्रदेशात पसरू शकतो. हुथींनी यापूर्वी सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमधील तेल प्रतिष्ठाने आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर हल्ले केले आहेत आणि त्यांच्याकडे सागरी मार्गांमध्ये व्यत्यय आणण्याची क्षमता आहे. दुसरीकडे हिजबुल्लाहने इस्रायली विमानावर क्षेपणास्त्र डागले असून लेबनॉनमध्ये इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातील संघर्ष वाढला आहे.

### इराणच्या दहा लाख सैनिकांनी भरला हुंकार

इराणने दहा लाख सैनिक आणि कमांडो युद्धभूमीसाठी सज्ज केले आहेत. हा दावा केवळ लष्करी सज्जता नसून, ते जागतिक महासत्तेला दिलेले एक गंभीर आव्हान आहे. अमेरिकेच्या संभाव्य भू-आक्रमणाची चर्चा सुरू असतानाच इराणने मानवी ढाल आणि गनिमी कावा या अस्त्रांचा वापर करण्याची तयारी दर्शवली आहे. इराणच्या नियमित सैन्याव्यतिरिक्त, त्यांच्याकडे इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स आणि बसिज यांसारखी निमलष्करी दले आहेत. १० लाख हा आकडा प्रामुख्याने या राखीव फौजेचा आहे. इराणचा इतिहास पाहता, १९८० च्या इराण-इराक युद्धावेळी त्यांनी अशाच प्रकारे तंत्र वापरले होते. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही, इराण आपल्या विशाल जनशक्तीच्या जोरावर अमेरिकेसारख्या प्रगत देशाला विनाशाच्या खाईत खेचण्याची धमकी देत आहे. हे केवळ लष्करी सज्जता नसून एक प्रबळ शत्रूला धाकात ठेवण्याचे धोरण आहे, असे मानले जात आहे.

## संक्षिप्त

### कोरियन अभिनेत्याचा संशयास्पद मृत्यू

**सेऊल :** दक्षिण कोरियातील अभिनेता ली सांग बो (वय ४४) याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. प्योंगटेक येथील घरात गुरुवारी त्याचा मृतदेह सापडला. त्याच्या मृत्यूचे नेमके कारण काय? याचा तपास पोलिसांकडून सुरु आहे. काही वर्षांपूर्वी अभिनेता ली सांग बो ड्रग्ज प्रकरणात अडकला होता. त्याच्यावर अवैध ड्रग्ज वापरल्याचा आरोप होता. २०२२ मध्ये त्याची निर्दोष मुक्तता झाली होती. त्याने ड्रग्जचे सेवन केले नव्हते, असे तपासातून समोर आले. मात्र, डिप्रेशनसाठी तो डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार घेत होता.

### अयोध्येत मंत्र्यांच्या यज्ञादरम्यान आग

**अयोध्या :** अयोध्येत एका धार्मिक कार्यक्रमादरम्यान एका भव्य यज्ञशाळेत यज्ञ सुरू असताना अचानक आग लागली. हा महायज्ञ उत्तर प्रदेशचे मंत्री दयाशंकर सिंह यांनी आयोजित केला होता. आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे परिसरातील अनेक मंडप जळून खाक झाले. यज्ञकुंडात अर्पण केलेल्या एका नारळाचा जोरदार स्फोट झाला आणि त्यातील ठिणग्या बाजूच्या कापडी मंडपावर पडल्यामुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. यज्ञशाळेत विधी सुरू असताना पूर्णाहुतीच्या वेळी एका नारळाचा स्फोट झाला आणि आग लागली.

### विमानाचे हवेतच बंद पडले इंजिन

**नवी दिल्ली :** हवेत असतानाच इंडिगो विमानाच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे विशाखापट्टणमहून दिल्लीला १६० प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या विमानाते शनिवारी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. विमानात १६१ प्रवासी होते. विमानाचे इंजिन फेल झाल्याचे लक्षात घेता एअरपोर्टवर तातडीने आणीबाणी घोषित केली. सकाळी ११ च्या सुमारास या विमानाचे सुरक्षित लँडिंग करण्यात आले, त्यामुळे एक मोठी दुर्घटना टळली. इंजिन फेल झाल्यानंतर विमानाचे संतुलन बिघडू शकते.

### गर्भलिंग निदानाच्या टोळीचा पर्दाफाश

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील कागल तालुक्यातील बिद्रीमधील बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रकरणाची व्याप्ती वाढत चालली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील डॉ. युवराज पाटीलला बेड्या ठोकल्यानंतर सहा एजंटाना देखील अटक केली. सगळ्यात धक्कादायक म्हणजे या डॉक्टराने अनेक भागात एजंटांचे जाळ पसरवून मुलीची गर्भातच हत्या केल्याचे समोर आले आहे. या दुष्यकृत्यातून त्याने लाखो रुपयांची माया जमवली आहे. या प्रकरणात डॉ. युवराज पाटील आणि एजंट संभाजी शिंदे यांच्या मुसक्या आवळल्यानंतर आता आणखी सहा जणांना इस्पूर्ली पोलिसांनी अटक केल्याने या टोळीचा पर्दाफाश झाला आहे.

### केंद्र सरकारने आर्थिक व तांत्रिक पाठबळ द्यावे : भुजबळ

# पीएनजी नेटवर्कचा विस्तार महाराष्ट्रात वेगाने करणार

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

महाराष्ट्रात पाईपद्वारे नैसर्गिक वायू पुरवठा करणाऱ्या नेटवर्कचा विस्तार अधिक वेगाने करण्यासाठी केंद्र सरकारने तांत्रिक सहाय्य आणि पायाभूत सुविधांसाठी विशेष आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी आज केली.

नवी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. ही बैठक केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर (शहरी विकास व गृहनिर्माण) आणि हरदीप सिंग पुरी (पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू) यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी, हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेशचे नगरविकास व अन्न नागरी पुरवठा मंत्री, केंद्रीय सचिव तसेच महाराष्ट्राचे अतिरिक्त मुख्य सचिव अनिल डिग्गीकर आणि विविध महापालिकांचे आयुक्त व नैसर्गिक वायू कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी भुजबळ यांनी पीएनजी विस्तारासाठी राज्य सरकारने उचललेल्या क्रांतिकारी पावलांची माहिती दिली. ते म्हणाले, की अनेकदा शेजाऱ्यांची संमती न मिळणे किंवा महापालिकेच्या रस्ते खोदाईच्या परवानग्यांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे गॅस पाईपलाइन टाकण्याचे काम रेंगाळते. ही अडचण दूर करण्यासाठी आता डीम्ड परमिशन (गृहित परवानगी) तत्त्व लागू करण्यात आले आहे. यानुसार, पाईपलाइन टाकण्यासाठी विविध विभागांकडे परवानगी मागितल्यानंतर ठराविक वेळेत प्रतिसाद न मिळाल्यास, ती परवानगी मिळाली आहे असे समजून काम पुढे नेता येईल. तसेच, नवीन गृहनिर्माण प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पीएनजी जोडणी असणे आता बंधनकारक करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या सोसायट्यांमध्ये गॅस पाईपलाइन पोहोचली आहे, तिथे पालिकेच्या अटींनुसार जोडणी घेतल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.



### राज्यात पुरेसा साठा

राज्यातील रिफायनरींमध्ये पुरेसा साठा उपलब्ध असून प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर वाढवून एलपीजीची टंचाई भासणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. ग्रामीण भागात सिलेंडरचा पुरवठा पूर्वीप्रमाणेच सुरू राहील. तसेच, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्याला मिळणारा सुमारे ३,७६८ किलो लिटर रॉकेलचा कोटा दरमहा उपलब्ध करून दिला जात असून रेशन दुकानांमार्फत होणारा पुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर दिला जात आहे.


# संकटाच्या काळात भारताने पुढे केला मदतीचा हात !

### श्रीलंकेला पाठवले ३८००० मेट्रिक टन पेट्रोल-डिझेल

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

पश्चिम आशियातील संघर्षामुळे भारतासह शेजारील राष्ट्रांनाही ऊर्जा संकटाचा सामना करावा लागत आहे. श्रीलंकाही यात समाविष्ट आहे. याच संकटावर मात करण्यासाठी श्रीलंकेने भारताकडे मदत मागितली आणि भारतानेही शेजारधर्म निभावला. भारताने श्रीलंकेच्या मागणीवर ३८ हजार टन पेट्रोलियम पदार्थ त्यांना पाठवले आहेत. त्यात २० हजार मेट्रिक टन डिझेल आणि १८ हजार मेट्रिक टन पेट्रोलचा समावेश आहे.

श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांनी २४ मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरून संवाद साधला होता. त्यानंतर आज भारताने श्रीलंकेला मदत केली आहे. या दोन्ही नेत्यांच्या चर्चेत पश्चिम आशियातील संघर्षावर भाष्य करण्यात आले. युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळी खंडीत झाली असून एकमेकांना ऊर्जा सहकार्य करण्यावर दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दिसानायके यांच्या चर्चेपूर्वी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री विजिता हेराथ यांच्यात फोनवरून संवाद झाला होता. श्रीलंकेने भारताच्या इंडियन ऑयल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून ३८ हजार मेट्रिक टन पेट्रोलियम पुरवठा करण्याची विनंती केली होती. रिपोर्टनुसार, भारत सरकार श्रीलंकेच्या आयओसीला तेलपुरवठा कायम ठेवण्यासाठी पाठिंबा देत आहे. श्रीलंकन आयओसीने यापूर्वी पश्चिम आशिया आणि सिंगापूरकडून मार्च महिन्यासाठी तेलपुरवठा मिळवला होता.




### श्रीलंकेतील जनजीवन ठप्प

तेल संकटाचा श्रीलंकेवर मोठा परिणाम झाला आहे. रेल्वे आणि बस स्थानके ओस पडली आहेत. शाळा आणि कार्यालये बंद केली जात आहेत. घरून काम करण्याचे कठोर नियम पुन्हा लागू करण्यात आले आहेत. इंधन वाचवण्यासाठी दर बुधवारी सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे. सरकारी कार्यालयांमधील एसी बंद आहेत. रस्त्यावरील दिवे आणि जाहिरात फलकही बंद करण्यात आले आहेत.

# नेपाळमध्ये माजी पंतप्रधान ओलींसह मंत्र्याला अटक

वृत्तसंस्था | काठमांडू

नेपाळमध्ये बालेन शाह यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेताच दुसऱ्याच दिवशी माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील गृहमंत्री रमेश लेखक यांना पोलिसांनी अटक केली आहे. भक्तपूरमधील गुंडू येथील त्यांच्या निवासस्थानातून पोलिसांनी त्यांना अटक केली. 'झेन-जी' आंदोलनादरम्यान झालेल्या मृत्यू प्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याचे वृत्त आहे.

नव्याने सत्तेवर आलेल्या पंतप्रधान बालेन शाह यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ही मोठी कारवाई करत कठोर संदेश दिला आहे. शुक्रवारी ३५ वर्षीय बालेन शाह यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. रॅपर ते महापौर आणि आता देशाचे पंतप्रधान असा त्यांचा प्रवास असून ते नेपाळच्या इतिहासातील सर्वात तरुण पंतप्रधान ठरले आहेत. शपथविधीनंतर लगेचच झालेल्या या अटकेमुळे देशात मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये नेपाळमध्ये 'झेन-जी' आंदोलन उसळले होते. या आंदोलनादरम्यान हिंसाचार भडकला आणि अवघ्या दोन दिवसांत ७० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. त्यावेळी सत्तेवर असलेल्या ओली सरकारवर या प्रकरणात जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत होती. याच प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली आहे. दोषी ठरल्यास ओली यांना १० वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते. नेपाळच्या राजकारणातील प्रभावी नेते म्हणून ओली यांची ओळख आहे.

## सौदीच्या राजपुत्रांशी नरेंद्र मोदींची चर्चा

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सौदी अरेबियाचे क्राऊन प्रिन्स आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान यांच्याशी चर्चा केली. यावेळी जलमार्गांचे संरक्षण आणि नेव्हिगेशनचे स्वातंत्र्य सुनिश्चित करण्याच्या आवश्यकतेवरही भर दिला. या संदर्भात एक्सवरील एका पोस्टमधून दिलेल्या माहितीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले, की आज सौदीच्या नेतृत्वाशी संपर्क साधून प्रादेशिक परिस्थितीबाबत चर्चा केली. या चर्चेदरम्यान, मोदींनी ऊर्जा केंद्रांवर होत असलेल्या हल्ल्यांचाही निषेध केला. यावेळी सध्याच्या तणावाच्या परिस्थितीत सागरी व्यापारी मार्ग खुले आणि सुरक्षित ठेवण्याच्या आवश्यकतेवर दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली.

## राष्ट्रीय महामार्गांतील प्रकल्पग्रस्तांसाठी ऐतिहासिक निर्णय

# प्रलंबित दावे जलद मार्गी लावण्यासाठी ५७ लवाद

वृत्तसंस्था | मुंबई

राज्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या अनेक प्रकल्पांमुळे भूसंपादनाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा वेगवान निपटारा करण्यासाठी केंद्र सरकारने राज्यात ५७ नवीन लवादांची नियुक्ती केली असून, यामुळे अनेक वर्षांपासून मोबदल्याविना रखडलेले २८ हजारांहून अधिक प्रकल्पग्रस्तांचे दावे आता जलदगतीने निकाली निघणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन यासाठी विशेष पुढाकार घेतला. केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासमवेत केंद्र व राज्य सरकारसोबत बैठकी होऊन झाल्या. राज्यातील विविध भागातील प्रकरणाचा अभ्यास करून सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आता लवादांची नियुक्ती झाली आहे.



राज्यात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचएआय) अनेक प्रकल्प सुरू आहेत. मात्र, भूसंपादनाच्या वाढीव मोबदल्याबाबतची सुमारे २८ हजारांहून अधिक प्रकरणे लवादांकडे प्रलंबित आहेत. प्रकल्पग्रस्तांचे हक्क, मोबदल्याची पद्धत व याविषयातील पारदर्शकता ही बाब लक्षात घेऊन महसूलमंत्री बावनकुळे यांनी या प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी स्वतंत्र लवादांची मागणी केली होती. त्यानुसार आता महाराष्ट्रातील अतिरिक्त आयुक्त आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील ५७ अनुभवी अधिकाऱ्यांची लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नव्याने नियुक्त करण्यात आलेले हे ५७ लवाद कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर या सर्व विभागांतील जिल्ह्यांमध्ये कार्यरत राहतील. ५७ नवीन लवादांची नियुक्ती झाल्यामुळे प्रलंबित २८ हजार प्रकरणे विशिष्ट कालमर्यादेत निकाली निघतील. प्रकल्पग्रस्तांना वेळेवर मोबदला मिळेल व राज्याच्या विकासाला गती मिळेल, असे बावनकुळे म्हणाले.

## आठ आयएएस अधिकाऱ्यांची बदली

वृत्तसंस्था | मुंबई

प्रशासनातील आठ आयएएस अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. एम. देवेंद्र सिंग यांची मुंबई महापालिकेत सहआयुक्त, डॉ. मैनक घोष यांची सांगली येथे जिल्हाधिकारी, प्रियंवदा म्हाड्डळकर यांची धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून, अशोक काकडे यांची महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळात व्यवस्थापकीय संचालक, राहुल रेखवार यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळचे सदस्य सचिव, श्वेता सिंघल यांची मुंबईत महामेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक, रुबल प्रखेर अग्रवाल यांची कोकणचे विभागीय आयुक्त आणि नयना गुंडे यांची बदली अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे.

## पान एकवरून

**भारताच्या मुत्सद्देगिरीमुळे...**

राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीनंतर शनिवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना फडणवीस बोलत होते. फडणवीस म्हणाले, की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्याशी चर्चा केली. आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युद्धामुळे पुरवठ्यावर होत असलेल्या परिणासंदर्भात ही चर्चा होती. जवळजवळ सगळ्याच राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांचे कौतुक करत त्यांचे आभार मानले. आपल्याकडे पुरवठ्यामध्ये कमीत कमी व्यत्यय आलेला आहे. विशेषत: पेट्रोल-डिझेल सातत्याने मिळत आहे. सर्वांना घरगुती गॅस मिळतो आहे. कालपासून व्यावसायिक गॅसची ७० टक्क्यांपर्यंत मर्यादा वाढवली आहे. त्यामुळे आपल्या आजूबाजूच्या देशांचा विचार करता सगळ्या देशांमध्ये काही ना काही व्यत्यय आला असून बऱ्याच गोष्टी बंद झाल्या आहेत. पण, भारतात त्या झाल्या नाहीत. पंतप्रधान मोदी यांनी यासंदर्भातील दीर्घकालीन रणनीती सांगितली. काही लोक जाणीवपूर्वक आपल्या देशात संभ्रम पसरवत असल्याचे त्यांनी सांगितले. लॉकडाऊन बिलकुल लागणार नाही. अशा गोष्टी पसरवणारे एक प्रकारे देशद्रोह करत आहेत. त्यामुळे अशा खोट्या बातम्या पसरवणाऱ्यांवर आम्ही कडक कारवाई करणार आहोत. भारताने ही परिस्थिती हाताळण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमुळे या गोष्टींचा आपल्या जीवनावर जास्त परिणाम होणार नाही, असा मला विश्वास आहे. आता तरी भारताच्या मुत्सद्देगिरीमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या आपुर्तीमध्ये जास्त अडचणी येतील असे वाटत नाही. होर्मुझमधून मोठ्या प्रमाणात एलपीजी येतो. पण त्यालाही काही नियमांच्या आधारे परवानगी मिळत आहे. पुरवठा थोडा मंद असला तरी तो येतो आहे,'' असेही त्यांनी सांगितले. देशात पुन्हा लॉकडाऊन लागणार आहे का, असे विचारले असता फडणवीस म्हणाले, की काही लोक जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करत आहेत. देशात किंवा राज्यात कुठेही लॉकडाऊन लागणार नाही. अशा अफवा पसरवणे हा एक प्रकारे देशद्रोहच आहे. अशा खोडसाळ प्रवृत्तींवर कठोर कारवाई केली जाईल.

**पाण्याच्या नळाप्रमाणे....**

लोक आवश्यक नसतानाही अतिरिक्त साठा करीत आहेत. यावरच मार्ग काढण्यासाठी पाईप लाईनने गॅस कनेक्शनच्या निर्णयासंदर्भात सरकार पावले उचलण्याची शक्यता आहे. भारत सरकारने पीएनजीची निर्मिती वाढवली असून आधी नऊ लाख मेट्रिक टन गॅसची निर्मिती केली जात असे, आता एलपीजीच्या तुटवड्यामुळे ११ लाख मेट्रिक टन गॅसची निर्मिती करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. यासाठी राज्य सरकारने सर्व महापालिका आणि नगरपालिकांना पीएनजी कनेक्शन देण्यासाठीच्या अटी आणि नियम शिथिल करण्याचा निर्णय शुक्रवारी रात्री घेतला. पाणी आणि वीज कनेक्शन जसे मिळते, तसेच आता मागेल त्याला (शक्य असेल तिथे) पीएनजी अर्थात पाईप लाईनने गॅस कनेक्शन मिळणार आहे, याचसंदर्भातील निर्णय सरकार घेऊ शकते.

**झटपट श्रीमंतीचा मोह....**

होते. चिखली येथे पोहोचल्यानंतर आरोपींनी त्यांना त्यांच्या कारमध्ये घेतले आणि व्यवहार सुरू असल्याचे भासवले. मात्र, योग्य संधी साधत त्यांनी गड्डा यांच्याकडील खरी रोकड हिसकावण्याचा प्रयत्न केला. गड्डा यांनी प्रतिकार केल्याने आरोपींनी त्यांच्या डोक्यावर जड वस्तूने वार केला. त्यानंतरही क्रूरतेची परिसीमा गाठत आरोपींनी जखमी अवस्थेत असलेल्या गड्डा यांना चालत्या कारमधून काही अंतर फरफटत नेले आणि रस्त्यावर फेकून दिले. गंभीर दुखापतीमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात सुरुवातीला संशयित ठरवण्यात आलेल्या कार चालक अनिल शिंदे यांना पोलिसांनी निर्दोष मुक्त केले आहे. शिंदे यांनी केवळ भाड्याने गाडी दिली होती. उलट, त्यांनी आरोपींच्या कारचा क्रमांक लक्षात ठेवून नातेवाईकांना माहिती दिली. त्यांच्या या सतर्कतेमुळे पोलिसांना आरोपींपर्यंत पोहोचणे सोपे झाले. कार क्रमांकाच्या आधारे पोलिसांनी नाकाबंदी करत संशयित वाहन अडवले आणि दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या चौकशीतून बनावट नोटांचे जाळे उघडकीस येत आहे. या घटनेमुळे झटपट श्रीमंतीच्या मोहात सुशिक्षित लोकही कसे फसतात, याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, या रॅकेटमागील इतर साथीदारांचा शोध सुरू आहे

**पूरग्रस्त शेतकऱ्यांना....**

गोठ्यांच्या दुरुस्तीसाठीही विशेष मदतीची तरतूद करण्यात आली आहे. नियमातील या ऐतिहासिक बदलामुळे अतिवृष्टीचा फटका बसलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला पुन्हा उभारी मिळण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता केवळ अल्प किंवा अत्यल्प भूधारकच नव्हे, तर सर्व आपद्ग्रस्त पशुपालक आणि भूमिहीन शेतकरीही मदतीसाठी पात्र ठरतील. पूर्वी असलेल्या जनावरांच्या संख्येच्या मर्यादा (उदा. ३ किंवा ६ जनावरे) आता पूर्णपणे हटवण्यात आल्या आहेत. केवळ मृतच नव्हे, तर पुरात वाहून गेलेली किंवा बेपत्ता झालेली सर्व जनावरे आता मदतीसाठी पात्र धरली जातील. पोल्ट्रीसाठी असलेली १० हजार रुपयांची जुनी मर्यादा काढून आता सर्व मृत पक्षांसाठी भरपाई दिली जाईल. मोठी दुधाळ जनावरांसाठी प्रति जनावर ३७,५०० रुपये आणि ओढकाम करणारी मोठी जनावरे प्रति जनावर ३२,००० रुपये अशी मदत मिळेल. लहान दुधाळ जनावरांसाठी प्रति जनावर २० हजार रुपये. शेळी किंवा मेंढी प्रति जनावर चारहजार रुपये आणि कुक्कुटपालन (कोंबड्या) : प्रति पक्षी १०० रुपये. पडझड किंवा पूर्णतः नष्ट झालेल्या गोठ्यांसाठी तीन हजार रुपये मदत दिली जाईल.

**पोलिसांचाच ६०....**

नोटांच्या गुन्ह्यात अडकवू अशी धमकी देत त्यांना तेथून हाकलून दिले. या प्रकारामुळे खेडकर पूर्णपणे घाबरले होते. या प्रकरणात आरोपी म्हणून पोलिस कर्मचारी राजेश मुंडे (नांदेड मुख्यालय), समीर साबेरखान पठाण (लिंबगाव पोलीस ठाणे), ओमकार विश्वनाथ भुरे आणि एक अज्ञात व्यक्ती यांचा समावेश आहे. खेडकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून २३ जानेवारी २०२६ रोजी लोहा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.गुन्हा दाखल होताच सर्व आरोपी फरार झाले होते. मात्र, स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत २९ जानेवारी रोजी ओमकार भुरेला अटक केली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर समीर पठाणलाही अटक करण्यात आली आहे. दरम्यान, राजेश मुंडे आणि आणखी एक आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नाहीत.

**राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्षाचा....**

माझी भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्या आर्थिक व्यवहारात, त्याच्या गैरकृत्यात दुरान्वये संबंध नाही, आजही तीच स्पष्ट व ठाम भूमिका आहे. तपासादरम्यान या सर्व बाबी निष्पन्न होतीलच. खोटे, असत्य व कुठलाही पुरावा नसताना जे आरोप माध्यमांमधून होत आहेत, ते वेदनादायक आहे. सत्य प्रखरतेने सिद्ध होईलच. खरात प्रकरणाचा तपास पारदर्शकपणे व निष्पक्षपणे व्हावा, ही माझी मागणी मी यापूर्वीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलीस महासंचालक यांच्याकडे केली आहे. आज सकाळी फोनद्वारे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार मी माझ्या राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे, असे चाकणकर यांनी म्हटले आहे.

# राहेरच्या श्री महादेव मंदिरात अखंड शिवनाम सप्ताहास प्रारंभ



प्रतीनिधी । **नरसी**

येथून जवळच आसलेल्या श्रीक्षेत्र राहेर (ता.नायगांव ) येथे श्री महादेव मंदिराचा प्रथम वर्धापन दिन व अखंड शिवनाम सप्ताह शिवकथा ग्रंथराज परम रहस्य पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला असून सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे चार ते सहा शिव पाठ सहा ते आठ रुद्राभिषेक आठ ते अकरा परम रहस्य पारायण एक ते चार शिवकथा सायंकाळी चार ते सहा शिव पाठ रात्री साडेआठ ते साडेदहा शिवकिर्तन व शिवजागर सुरु आहे .

या शिवनाम सप्ताहात गायक शिवलिंग पाटील हत्ते, किशन महाराज , महादेव स्वामी नंदगावकर , सुरेश पाटील , मृदंग वादक बसवराज मठवाले एकलारा , शिवपाठ प्रमुख शिवलिंग पाटील हत्ते तर भजनी मंडळ राहेर , हरणाळा , तोरणा , दुगाव, कुंभारगाव , कोळगाव , खपराळा, कावलगुडा , गुजरी , परम रहस्य पारायण माधवराव मोघे , विनाप्रमुख गोविंद कळसे , पुजारी दयानंद स्वामी, रुद्राभिषेक पुजारी श्रीकांत मठवाले यांची सेवा तर दररोज रात्री नामवंत किर्तनकार यांचे शिवकीर्तन सेवा होत आहे.

शिवभक्त परायण कुमारी आरती कावरे बोरी, शिवभक्त परायण प्रसाद महाराज बोर्डीकर , कुमारी अश्विनी रामदास वसमत लोहगावकर , दि.२८ अमोल महाराज बनवसकर यांची किर्तनसेवा झाली.

दि. २९ राजेश्वर स्वामी जामगव्हाणकर , ३० मार्च संजय महाराज निंबाळवाडीकर, ३१ मार्च लक्ष्मण महाराज विभुते गुरुजी लातूर , दि. १ एप्रिल शिवानंद महाराज दापशेडकर यांचे शिवकिर्तन व महाप्रसाद एक एप्रिल रोजी बुधवारी प्रसादाच्या कीर्तनानंतर सुरू होणार आसल्याची माहीती प्रसिद्धी पत्राद्वारे देण्यात आली आहे. कार्यक्रम यशस्वितेसाठी समस्त गावकरी मंडळी परीश्रम घेत आहेत .

## जिल्ह्याच्या बाजारपेठेत टोमॅटो, बटाटे, कोबी, काकडीचे दर स्थीर

# आवक घटल्यामुळे भाजीपाला महागला

प्रतिनिधी । **नांदेड**

जिल्हयात तापत्या उन्हामुळे भाजीपाला आवकेत मोठी घट झाल्यामुळे बाजारात भाजीपाला महागला आहे. तथापी टोमॅटो, बटाटे, कोबी, काकडीचे दर सध्या स्थिर आहेत. गेल्या काही दिवसांपासून भाजीपाला मार्केटमध्ये मोठी चढउतार होवू लागली होती. परंतु तापत्या उन्हामुळे भाज्यांचे पीक लवकर नाशवंत होऊ लागले आहे. बाजारपेठेत सुरक्षित माल आणण्यासाठी तेवढीच काळजी घ्यावी लागते असे व्यापारी सूत्रांनी सांगितले आहे.वाढत्या उन्हाबरोबरच भाजीपाला बाजारात मिरची, अद्रक व लसणाला भाववाढीची फोडणी मिळाली आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत मिरची व अद्रकच्या भावात २० रुपयांची वाढ होऊन प्रतिकिलो १०० रुपयांवर पोचले.

लसूण १५० रुपये किलोवर पोचला आहे. लिंबाचे भाव २०० रुपये किलोवर पोचले होते. त्यात आता ५० रुपयांची घसरण झाली. सध्या १५० रुपये किलोने लिंबू मिळत आहे. सध्या भाजीपाला बाजारात टोमॅटो, बटाट्याची आवक वाढलेली आहे. त्यामुळे टोमॅटो, बटाटेसह कोबी, काकडीचे भाव स्थिर राहिल्याने गृहिणींना काहीसा दिलासा मिळला. बाजारपेठेत रोजची ६०० ते ६५० क्विंटल बटाट्याची आवक होते.

टोमॅटोची १२० ते १५० क्विंटल एवढी आवक होत आहे. भाजीमंडईच्या ठोक बाजारात बटाट्याला एक हजार रुपये, तर टोमॅटोला ८०० ते १००० रुपये क्विंटलचा भाव मिळत आहे. म्हणजे, ठोक बाजारात ८ ते १० रुपये किलो दराने विक्री होणारे बटाटे, टोमॅटो किरकोळ बाजारात ग्राहकांना २० रुपये किलोने मिळत आहे.



### या भाज्या आहेत स्वस्त

बटाटे २० रुपये,काकडी ३० रुपये,भोपळा ३० रुपये,वांगे ३० रुपये,कोबी ४० रुपये, गाजर ५० रुपये,भेंडी ६० रुपये,काय महाग, शेवगा ७० रुपये,सिमला मिरची ८० रुपये,कारले ८० रुपये,दोडके ८० रुपये,दिलपसंद ८० रुपये,अद्रक १०० रुपये,हिरवी मिरची १०० रुपये,लसूण १५० रुपये,लिंबू १५० रुपये

### वांग्याच्या भावात ५० टक्के घट

मागील आठवड्याच्या तुलनेत यावेळी वांग्याच्या भावात ५० टक्क्यांपर्यंत घट झाली. ६० रुपयांवर पोचलेले वांग्याचे भाव आता ३० रुपयांपर्यंत घसरले. दुसरीकडे कोबी, काकडी व भोपळा ३० ते ४० रुपयांना मिळत आहे. गाजर भावात किलोमागे १० रुपयांची वाढ झाली. सध्या गाजर ५० रुपये व वाल ६० रुपये किलोवर पोचालाय. तर शेवगाही १० रुपयांनी महागलाय.

## संक्षिप्त

### हनुमान महोत्सवाचे आवाहन

**नांदेड:** हनुमान पेठ महावीर चौक नांदेड येथील हनुमान मंदिरात दरवर्षीप्रमाणे हनुमान जन्मोत्सव यावर्षीही उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात येणार असून महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले आहे. सदर हनुमान जन्मोत्सव येत्या २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी साडेनऊ पासून महाप्रसादास आरंभ होणार असून याकरिता ज्या कोणास सदर महाप्रसादासाठी काही देणगी अथवा सहकार्य करायचे असल्यास सदर हनुमान भक्तांनी सकाळी सात ते दुपारी १२ दरम्यान व सायंकाळी पाच ते आठ यादरम्यान प्रत्यक्ष मंदिरात येऊन संपर्क करण्याचे आवाहन जन्मोत्सव समिती हनुमान पेठ महावीर चौक नांदेडतर्फे केले आहे.

### खरेदी-विक्री संघासाठी आज मतदान

**उमरी :** खरेदी विक्री संघाची निवडणुकीसाठी २९ मार्च रोजी सकाळी ७ ते दु.४ वाजेपर्यंत मतदान पार पडणार असून एकूण १२ जागेसाठी ३१९ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत उमरी खरेदी विक्री संघ मागील चार दशकापासून गोरठेकर गटाच्या ताब्यात असून यावेळेस राष्ट्रवादी व काँग्रेस या दोन पक्षाची युती असून शिरीषभाऊ गोरठेकर. प्रल्हाद पाटील ढगे, प्रकाश पाटील चिंचाळकर, सुभाष गोरठेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी व काँग्रेस निवडणुकीला सामोरे जात आहेत तर भारतीय जनता पार्टी सुद्धा आमदार राजेश पवार,मारोतराव कवळे गुरुजी, संजय कुलकर्णी, डॉ. विक्रम देशमुख, अमोल ढगे, ज्ञानेश्वर सावंत. बापूसाहेब कवडगावकर, यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी सहकार बचाव पॅनलच्या माध्यमातून या निवडणुकीला सामोरे जात आहे.

# मारहाण व धमकीप्रकरणी प्रकरणी गुन्हा दाखल ; चौघांवर कारवाई

प्रतिनिधी । **किनवट**

तालुक्यातील पेंदा नागढवं शेत परिसरात जुन्या वादातून झालेल्या भांडणात मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१४ मार्च रोजी सकाळी सुमारे ०८.३० वाजण्याच्या सुमारास किनवटपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या शेतात ही घटना घडली. फिर्यादी राजेश्वर इजारे (वय २७ वर्षे, रा. पार्डी ता. किनवट हे आपल्या शेतात असताना आरोपींनी त्यांच्याशी वाद घातला.

या प्रकरणातील आरोपींमध्ये शिवाजी बोइनवाड, अशोक बोइनवाड, बाबू बोइनवाड व सुभाष बोइनवाड (सर्व रा. पार्डी ता. किनवट) यांचा समावेश आहे. आरोपींनी जुन्या वैरातून फिर्यादीला शिवीगाळ करत हाताने व चप्पलने मारहाण केली. या घटनेत फिर्यादीला दुखापत झाली असून, घटनेमागे पूर्वी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीचा राग असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६१/२०२६ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ११५(२), ३५२, ३५१(२) तसेच ३(५) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार सिद्धार्थ वाघमारे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

# प्र-कुलगुरू महाजन यांची युजीसी इंफ्ली बनेट केंद्रास भेट

प्रतिनिधी । **नांदेड**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांनी गांधीनगर (गुजरात) येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे अंतर विद्यापीठ असलेल्या इंफ्लीबनेट केंद्रास भेट दिली. इंफ्लीबनेट केंद्राचे प्र. संचालक श्री मनोज कुमार के. यांनी इंफ्लीबनेट केंद्राचे सन्मानचिन्ह देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी इंफ्लीबनेट केंद्राच्या विविध विभागांना भेटी देऊन केंद्राचे उपक्रम व सेवांची माहिती करून घेतली. इंफ्लीबनेट हे भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्वाचे केंद्र असून भारतातील सर्व पीएच. डी. प्रबंधाचे डीजीटलायझेशन करून सर्व प्रबंध सर्वांना मुक्त उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वन नेशन, वन सबस्क्रीप्शन अंतर्गत केंद्र शासनाच्या सहा हजार कोटी रुपयाच्या निधीतून तेरा हजाराहून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्स व डाटाबेस भारतीय उच्च शिक्षण संस्थाना उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा इंफ्लीबनेटच्या उपक्रमात सक्रीय सहभाग असून हे विद्यापीठ शोधगंगोत्री या मध्ये भारतात पहिला तर शोधगंगा मध्ये महाराष्ट्रात तिस-या व भारतात पहिल्या वीस विद्यापीठात आहे. वन नेशन, वन सबस्क्रीप्शन, वांग्मयचौर्य तपासणी, विद्वान प्रोफाईल, इंडकॅट, इंडियन रिसर्च इंन्फोरमेशन मॅनेजमेंट सिस्टम, सोल, शेरनी, लिब वाहिनी इत्यादी डीजीटल उपक्रमात ही हे विद्यापीठ सक्रीय आहे. विद्यापीठाच्या या सक्रीय सहभागाबद्दल इंफ्लीबनेट केंद्राचे प्र. संचालक मनोज कुमार के. आनंद व्यक्त करून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांचे अभिनंदन केले.

# मेंदू विकारग्रस्तांच्या आरोग्य शिबिराला मोठा प्रतिसाद

प्रतिनिधी । **नांदेड**

रामनवमी जन्मोत्सवाच्या पावन नांदेड - समाजसेवेची उज्ज्वल परंपरा जपणाऱ्या राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या पुढाकारातून मेंदूचे विविध विकार असणाऱ्या मुला-मुलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष आरोग्य शिबिराला यंदाही मोठा प्रतिसाद मिळत आहे. जयवकील फाउंडेशन, बीजे वाडिया चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, कमल उडवाडिया फाउंडेशन, एनएच-एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, अन्नम आणि एओसीएन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे.




शहरातील मगनपुरा, नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात शुक्रवार, दि. २७ मार्चपासून सुरू झालेल्या या शिबिराला शनिवार, दि. २८ मार्च रोजीही मोठी गर्दी पाहायला मिळाली. यंदाचे हे सोळावे वर्ष असून एकूण एकोणतीसावे शिबिर ठरत आहे. प्रख्यात तज्ज्ञ डॉ. अनैता हेगडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमकडून रुग्णांवर अत्याधुनिक पद्धतीने उपचार केले जात आहेत. या आरोग्य शिबिरासाठी केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगाना राज्यांतूनही मोठ्या संख्येने रुग्ण येत आहेत. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने निवास आणि जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या यशासाठी संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, तसेच सदस्य बनारसीदासजी अग्रवाल आणि अंकित अग्रवाल हे शिबिरस्थळी उपस्थित राहून देखरेख करत आहेत. तसेच मुख्याध्यापक मधुकर मनुरकर, वसतिगृह अधीक्षक संजय शिंदे आणि दोन्ही शाळांतील कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# वाहनाच्या धडकेने दुचाकी स्वार ठार

प्रतिनिधी । **मुदखेड**

भरधाव वेगातील वेगाने वाहनाच्या दुचाकी स्वारास चिरडले असून या



अपघातात मुदखेड शहरातील कन्हैयासिंग विठ्ठलसिंग राठोड (ठाकूर) वय ४९ यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

नांदेड शहरात खरेदी करून घराकडे परत येत असताना दि २७ शुक्रवारी रात्री ९.३० च्या सुमारास भरधाव वेगातील अज्ञात मोठ्या वाहनाने दुचाकी स्वारास चिरडल्याची घटना मुगट पाटी जवळ घडली आहे .

यामध्ये कन्हैयासिंग विठ्ठलसिंग राठोड राहणार शिवाजीनगर मुदखेड यांचा जागीच मृत्यू झाला आहे . यानंतर घटनेच्या ठिकाणावरून अज्ञात वाहन फरार झाले आहे .

यापूर्वी हायवा दुचाकी अपघातात मुदखेड शहरातील सुवर्णकारागीर संतोष टाक यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती . यानंतर काही दिवसांपूर्वीच माळकोठा या ठिकाणी टिप्परने दुचाकी उडविल्याने यामध्येही एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे . यानंतर आता आमलेट विक्रेता गावाकडे परत येत असताना अज्ञात वाहनाने चिरडल्याने कन्हैयासिंग विठ्ठलसिंह राठोड (ठाकूर) यांचा हा जागीच ठार झाला आहे .

वाहनांच्या वेगावर नियंत्रण नसल्याने अपघाताच्या घटना सातत्याने घडत आहेत . यामुळे निष्पाप लोकांना जीव गमविण्याची वेळ आली आहे . मुदखेड पोलीस ठाण्यात अपघाताच्या घटना गुन्ह्याची नोंद प्रक्रिया रात्री उशिरा पर्यंत सुरू होते.

# चंद्रप्रकाश देगलूरकर यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी । **नांदेड**

अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे नेते व नांदेड येथील



सुप्रसिद्ध साहित्यिक, लेखक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार इंजि. चंद्रप्रकाश गंगाधरराव देगलूरकर यांना महाराष्ट्र पोलीस सोशल असोसिएशन लातूर तर्फे देण्यात येणारा नेताजी सुभाष चंद्र बोस राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.

रविवार दिनांक २९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता भालचंद्र ब्लड बँक सभागृह, मध्यवर्ती बस स्टँडजवळ, लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते नेताजी सुभाष चंद्र बोस राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार -२०२६ चे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनचे संस्थापक सचिव व कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सुफी सय्यद शमशोद्दीन, लातूर यांनी दिली.

इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांना यापूर्वी असंख्य पुरस्कार मिळाले आहेत.

# दिशादोष असल्याने तहसीलचे दार बंद !

प्रतिनिधी । **किनवट**

पुरोगामी महाराष्ट्रात बुवाबाजीचे प्रमाण अत्यंत वाढले आहे. किनवट तहसील कार्यालयाच्या नवीन इमारतीचे मुख्यद्वार आज पर्यंत उघडले नसल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बांधकाम पूर्ण होऊनही बरीच वर्षे ही इमारत बंदच होती. इमारत बांधकामात वास्तुदोष असल्याने बराच काळ इमारत बंद ठेवण्यात आली होती.



तत्कालीन प्रभारी असलेल्या तहसीलदाराने मोठ्या हिमतीने इमारत ताब्यात घेऊन कारभार सुरू केला पण त्यांची सेवा संपत आल्याने ते अल्पकालीन ठरले. त्यानंतर आलेल्या कोणत्याही तहसीलदाराने अपशकूनाच्या भीतीने पश्चिम दिशेचा दरवाजा उघडलाच नाही. कुण्यातरी नामवंत बाबा ने हा दरवाजा न उघडण्याचा सल्ला दिल्याचे ऐकीवात आहे. या सल्ल्यामागे नाशिक कनेक्शन असल्याचे बोलल्या जात आहे. खरंतर मुख्य बाजाराच्या दिशेने असलेला दरवाजा बंद ठेवल्यामुळे आलेल्या लोकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सर्व इमारतीला पायपीट करावी लागत आहे. या कार्यालयात वयोवृद्ध, दिव्यांग, अबाल व महिला मोठ्या संख्येने हेलपाटे मारत असतात. वेळेवर कोणताच अधिकारी उपस्थित नसतो आणि वरून बाजाराच्या दिशेने असलेला दरवाजा बंद असल्याने अधिकची पायपीट करावी लागते.

हा दरवाजा तात्काळ उघडा करावा अन्यथा या दारासमोर आंदोलन करण्याचा इशारा शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश कदम पाटील यांनी दिला आहे. यावेळी श्रीनिवास अण्णा जमादार, दादाराव डोंगरे व त्रिभुवनसिंग ठाकूर उपस्थित होते.

# तापमानाचा पारा ३८ अंशावर ! खबरदारी घेण्याची आवश्यकता

प्रतिनिधी । **किनवट**

तालुक्यात उष्णतेचा जोर अधिक जाणवत आहे. आजचे कमाल तापमान सुमारे ३८ अंश सेल्सीअसवर नोंदवले गेले, तर किमान तापमान २२ अंश सेल्सीअसच्या आसपास राहिले आहे. सकाळपासूनच उन्हाची तीव्रता वाढलेली दिसून आली आणि दुपारच्या वेळी नागरिकांना उकाड्याचा अधिक

तालुक्यातील तापमानात झाली लक्षणीय वाढ झाल्याने त्रास सहन करावा लागत आहे.

दिवसभर आकाश प्रामुख्याने निरभ्र राहिल्यामुळे सूर्यकिरणांचा तडाखा अधिक जाणवतो.

दुपारच्या वेळेत गरम वारे वाहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घेणे आवश्यक आहे. दरम्यान दुपारी १२ ते ४ या वेळेत बाहेर जाणे टाळावे, पुरेसे पाणी पिणे आवश्यक, हलके व सूती कपडे परिधान करावेत, उन्हात बाहेर पडताना टोपी, गॉगल किंवा रुमाल वापरावा, हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्णतेपासून बचाव करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**उत्सव** शिव-पार्वती विवाह सोहळा व अन्य धार्मिक कार्यक्रम

# गंगणबीड येथे आंबली- बारसी चैत्रयात्रेस आजपासून सुरुवात

प्रतिनिधी । **नांदेड**

नायगाव तालुक्यातील प्रसिद्ध व जागृत देवस्थान असलेल्या श्रीक्षेत्र गंगणबीड येथे आंबली-बारसी निमित्त रविवार दि.२९ ते मंगळवार दि.३१ मार्च रोजी या कालावधीमध्ये पालखी उत्सव शिव-पार्वती विवाहसोहळा व चैत्र यात्रा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती देवस्थान समिती कडून देण्यात आली आहे. श्रीक्षेत्र गंगणबीड हे अतिशय जाज्वल्य आणि प्राचीन देवस्थान आहे.




शिखर शिंगणापूरनंतर इथल्या देवस्थानावर भाविकांची प्रचंड श्रद्धा आहे.सोहळ्याची कार्यक्रम पत्रिका पुढीलप्रमाणे आहे: रविवारी २९ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता देवस्थानचे मुख्य पुजारी भागवत अप्पा स्वामी यांच्या निवासस्थानी शिव-पार्वतीचे विधिवत महाभिषेक आरती होऊन बँड-बाजा पथक,हलगी-सनई व भजनी मंडळीच्या निनादात वाजत- गाजत गावातील मुख्य रस्त्याने शिव-पार्वती पालखी सायंकाळी ८ वाजता हनुमान मंदिर येथे पोहचेल. तिथेही पुनश्च विधिवत महाभिषेक-आरती केल्यानंतर पालखी रात्री ९ वाजता पारंपरिक वाद्याच्या गजरात श्रीक्षेत्र महादेव मंदिरात पोहचेल. तिथे महारुद्रभिषेक आणि रात्री ९:३० वाजता शिव-पार्वती शुभविवाह संपन्न होईल. तदनंतर आरती व फटाक्यांची नयनरम्य अतिषबाजी होणार आहे.

सोमवार दि.३०मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वा.द्वादशी-बारसी निमित्त गावकऱ्यांतर्फे चैत्र-आंबलीचा भव्य महाप्रसाद होईल.त्यानंतर दिवसभर परिसरातील असंख्य भाविक काठी-कावडी घेऊन शिव पार्वतीचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी करतात.

मंगळवार दि.३१ मार्च रोजी सकाळी ९ वाजता मंदिरात शिव पार्वतीचे पुजन होऊन पारंपरिक वाद्याच्या गजरात पालखी गावाकडे प्रस्थान करेल.गावातील मुख्य रस्त्याने हनुमान मंदिर मार्गे देवस्थानचे मुख्य पुजारी अप्पा स्वामी यांच्या घरी विधिवत पुजा आरतीने महोत्सवाची सांगता होणार आहे.परिसरातील सर्व भक्तमंडळींनी बहुसंख्येने उपस्थित राहून सोहळा यशस्वी करण्यास सहकार्य करावे,असे आवाहन श्रीक्षेत्र गंगणबीड ग्रामस्थ मंडळी व मंदिर देवस्थान समितीतर्फे करण्यात आले.

# शासनाच्या व्यसनमुक्ती पुरस्काराने छाया बैस - चंदेल सन्मानित



प्रतिनिधी । **नांदेड**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सन २०२०-२१ चा मानाचा राष्ट्रपती महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने जानापुरी ता लोहा येथील प्राथमिक पदवीधर विषय शिक्षिका राज्य पुरस्कार प्राप्त उपक्रमशील शिक्षिका छायाताई बैस चंदेल यांना मुंबई येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. रोख १५ हजार रुपये, मानपत्र, मानचिन्ह, पैठणी असे या पुरस्काराचे स्वरूप आहे .

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले, राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी मंत्री सिद्धराम महत्रे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाज कल्याण विभाग मुंबईच्या आयुक्त दीपा मुधोळ - मुंडे, कीर्तनकार सत्यपाल महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कौटुंबिक प्रपंच सांभाळून, अध्यापनाचे पवित्र कार्य कर्तव्य तत्परतेने करत झोकून देत केलेल्या उल्लेखनीय कार्याची शासनाने दखल घेतली आहे.विविध प्रकारच्या शेकडो पुरस्काराने सन्मानित छायाताई बैस चंदेल यांची व्यसनमुक्ती प्रचारिका म्हणून महाराष्ट्र शासनाच्या पुरस्काराची मोहोर उमटवली आहे.

# अमेरिका, इराण आणि भारत

–प्रा.प्रशांत टाके
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर

**इराणने समोर आलेल्या साम्राज्यवादी आव्हानांना परतवून लावण्यासाठी दाखवलेला स्वावलंबन आणि प्रतिरोधाचा मार्ग इतरांसाठी मर्मभेदी ठरू शकतो. कोणत्याही देशाचा राष्ट्रवाद धगधगता ठेवायचा असेल तर जनसामन्यांची समज, बुद्धिवाद्यांची मतं आणि प्रभावशाली वर्गाची भूमिका एका निश्चित, विधायक मार्गाने कार्यन्वित होणे महत्त्वाचे असते. युद्धाची आपल्याला विशेष झळ बसणार नाही म्हणून या युद्धाशी आपला काय संबंध? अशा अविर्भावात राहू शकत नाही.**

मागच्या काही दशकांतील अंतरराष्ट्रीय घडामोडी पाहता मानवी समाज तंत्रज्ञान आणि भौतिक प्रगतीच्या ऐतिहासिक उंचीवर पोहचला असताना राजकीय नैतिकता मात्र गमवून बसल्याचे ठळकपणे दिसून येते. १९४७ हे भारतीय स्वातंत्र्याचे वर्ष, हाच साम्राज्यवादाच्या अस्ताचा क्षण समजला जातो. कारण १९५० च्या दशकात भारतापाठोपाठ अनेक आशियाई आणि आफ्रिकी देश ब्रिटन व इतर पश्चिमी सत्तांच्या जोखडातून स्वतंत्र झाले. परंतु ते त्यांच्या वर्चस्वातून आणि नियंत्रणातूनही तेव्हाच मुक्त झाले असे म्हणता येत नाही. ते आजही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या पश्चिमी सत्तांच्या वर्चस्वाखाली मार्गक्रमण करताना दिसतात. यालाच नव–साम्राज्यवाद, असे म्हणतात. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील सत्ता खिळखिळ्या झाल्या आणि अमेरिका महासत्ता म्हणून अधोरेखित झाली. अमुक एका राष्ट्राकडून जागतिक शांततेला, लोकशाही मूल्यांना धोका आहे, असा कांगावा करत सत्तापालट करून आपल्या मर्जीतील कमकुवत, भ्रष्ट सरकार तेथे बसवणे, नाहीच जमले तर प्रादेशिक, जागतिक व्यापारात त्या देशाला वेगळे पाडणे; आंतरराष्ट्रीय नाणे निधी, संयुक्त राष्ट्रसंघ आणि इतर जागतिक मंचावरील आपल्या हुकुमतीचा वापर करून, आयात–निर्यात शुल्काचे हत्यार उपसून आपल्या भूमिकेचा प्रतिरोध करणाऱ्या राष्ट्रांना कोंडीत पकडणे आणि आपले भू राजकीय, व्यापारी हितसंबंध बळकट करत राहणे, अशी अमेरिकेची परराष्ट्रनीती पूर्वापार राहिलेली आहे. ट्रंप यांच्या दुसऱ्या कार्यकाळात अमेरिकेची युद्धखोरी अजूनच वाढली आहे.

साम्यवादी रशिया हा लोकशाहीला धोका असल्याचे सांगत चार दशके चालवलेले शीतयुद्ध रशियाच्या विघटनानंतर वरकरणी शमले. मग १९९० च्या दशकापासून इस्लामिक कट्टरतावादाचा जागतिक शांततेला धोका असल्याचे भासवत अमेरिकेने मोर्चा आखाती देशांकडे वळवला. अमेरिकेचे पुढचे पाऊल पडले ते प्रगतीच्या रथावर स्वार झालेल्या चीनकडे. चीनची आपल्या तोडीस तोड सामरिक ताकत पाहता वेगवेगळ्या आघाड्यांवर असहकार्य करणे, चीनच्या भूमिकांवर संशयाचे ढग निर्माण करून एकटे पाडणे. चीनशी जवळीक साधणाऱ्या देशांना लक्ष्य करणे, अशा चाली खेळून अमेरिका आता चीनपुढे अडथळ्यांची शर्यत मांडू पाहत आहे. एकंदरित चित्र पाहता अमेरिकी नव–साम्राज्यवादाचा सर्वाधिक फटका तेलसमृद्ध परंतु आकाराने छोट्या व सामरिक शक्ती कमी असणाऱ्या राष्ट्रांना बसत आल्याचे दिसून येते. मध्य पूर्वेतील, आफ्रिकेतील तेल समृद्ध देश सातत्याने अस्थिर ठेवून तेथे आपल्या इशाऱ्यावर चालणारे राज्यकर्ते नेमून पुरवठा साखळीवर नियंत्रण मिळवणे व आपल्या अर्थव्यवस्थेला गतिमान ठेवण्यासाठी विनासायास आणि कमी किंमतीत तेल मिळवण्याची व्यवस्था अमेरिका करत आली आहे. आजचे इस्राईल–अमेरिका–इराण युद्ध या साखळीतील एक कडी होय.



इराणवर सरप्राइज हल्ला करून युद्धाच्या सुरवातीलाच सर्वोच्च नेते आयतुल्ला अली खोमेनी आणि काही शीर्ष अधिकाऱ्यांना मारून इराणी जनतेला सत्ता हातात घेण्याचे आवाहन करणारी अमेरिका–इस्रायल जोडगोळी तोंडघशी पडताना दिसते, याचे श्रेय इराणच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या कार्यक्रमाला द्यावे लागेल. शीतयुद्धाच्या काळात या जोडगोळीशी सलगी असलेला इराण त्यांचा प्रतिरोध करण्यास का व कसा सज्ज झाला हे जाणून घेणे नव–साम्राज्यवादाच्या नावाने बोटे मोडणाऱ्या सर्व छोट्या मोठ्या देशांसाठी गरजेचे आहे. इराण आणि इस्रायल यांचा मध्यपूर्वेतील संघर्ष या साम्राज्यवादी सापळ्याचाच एक भाग आहे. १९ व्या शतकापासून पॅलेस्टाइन या देशातील यहुदी राष्ट्रवादी चळवळीतून याच भूमीत यहुदी लोकांचे एक सर्वोभोम राष्ट्र असावे, अशी मागणी समोर येत होती. संयुक्त राष्ट्र संघाने १९४८ मध्ये इस्रायल हे यहुदी आणि पॅलेस्टाइन हे अरब राष्ट्र, अशी फाळणी केली. नव्याने उदयास आलेला इस्रायल हा देश अमेरिकेच्या साथीने अल्पावधीतच मध्यपूर्वेतील एक शक्ती म्हणून समोर आला. सुरुवातीच्या काळात इराण व इस्रायल यांच्यात दुराव्याचे संबंध असले तरी पेहलवीच्या राजवटीत (१९५३ ते १९७९) या दोन्ही देशांत कमालीची जवळीकता निर्माण झाली. इराण हा इस्रायलची तेलाची गरज भागवून त्या देशाकडून तंत्रज्ञान विकसित करून घेऊ लागला. दोघांनी एवढी घट्ट धोरणात्मक भागीदारी रचली की इस्रायलची मोसाद आणि इराणची सावाक या गुप्तचर संस्था इराणमध्ये संयुक्त कारवाया करत असत. परंतु १९७९ च्या इराणी क्रांतीनंतर खोमेनीच्या काळात या दोन देशांत विचारधारात्मक भेद निर्माण झाला. १९९० च्या दशकात इराणने आपला अणू कार्यक्रम चालू केल्यावर तर हे वैर आणखी गडद झाले. तेंव्हापासून मध्यपूर्वेवर वरचष्मा राहावा म्हणून दोन्ही देशात प्रॉक्सी वॉर चालूच होते.

देशातील तेलसाठ्यांचे राष्ट्रीयकरण करणाऱ्या पंतप्रधान मोसादेह यांच्या लोकशाही सरकार विरोधी झालेल्या बंडामध्ये मोहम्मद रेझा शाह पेहलवीची साथ देत अमेरिकेने इराणमध्ये १९५३ साली सत्ताबदल घडवून आणला. पेहलवीच्या नेतृत्वातील इराण १९७९ पर्यंत इस्रायल व अमेरिकेच्या सावलीत राहून विकास साधण्याचा प्रयत्न करू लागला. त्याने इराणचे पाश्चिमात्यीकरण व आधुनिकीकरण केले. परंतु या सरंजामी राजवटीत इराणची संपत्ती काही मोजके उद्योगपती, राजकारणी, धनदांडग्यांकडे एकवटली; खेडी कंगाल झाली, भ्रष्टाचार, बेरोजगारी वाढली, लोकशाही नावापुरतीच उरली. सत्तेचे केंद्रीकरण आणि पाश्चिमात्यीकरण याच्या विरोधात गेलेल्या जनमताचे उलेमा असलेल्या रुहुल्लाह खोमेनी यांनी नेतृत्व केले आणि १९७९ ची इराणी क्रांती यशस्वी केली.

त्यांच्यानंतर १९८९ पासून सत्तेवर असलेल्या आयतउल्ला अली खोमेनी यांनी स्वावलंबन आणि पश्चिमात्य शक्तींविरुद्ध प्रतिरोधाचे धोरण अवलंबले. त्यांनी आपले सर्वोभौमत्व ठणकावून सांगितले. लेबनॉनमधील हिझबुल्लाह, सीरिया, इराक आणि येमेन मधील काही गट यांना सोबत घेत प्रतिरोधाची मोट बांधली. इस्लामिक रिव्हल्युशनरी गाड्‌र्स कॉप्सची स्थापना करून सामरिक शक्ती वाढवण्यावर भर दिला. शिक्षण व तंत्रज्ञानात गुंतवणूक करून मानवी संसाधन तयार केले. उद्योगांचा विस्तार करून तेलावरील अर्थव्यवस्थेचे अवलंबित्व कमी केले. इस्लामिक संस्कृतीचे पुनःरुजजीवन केले आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची ताकद उभी केली. १९९०–९१च्या आखाती युद्धात इराकने कुैतवर ताबा मिळवल्याचा इराणने निषेध केला असला तरी आखाती युद्धात इराण अलिप्त राहिला, कधीही इराणची भूमी अथवा सैनिक यांचा वापर इराकच्या विरोधात करू दिला नाही. आज इराण शेजारी देशांतील अमेरिकी तळांवर हल्ले चढवताना त्यांच्याकडून आपला वापर होऊ न देण्याची अपेक्षा बाळगतो आहे. अगदी पेहलवीच्या काळापासून ते आजतागायत इराणची परराष्ट्रनीती व्यवहारवादी राहिली आहे.

खोमेनी यांनी अमेरिकेच्या निर्बंधांना झुगारून आधुनिक शस्त्र निर्मिती आणि आण्विक कार्यक्रम चालवला आणि देशाला महत्वाची प्रादेशिक शक्ती म्हणून स्थापित केले. आपली विश्वासार्हता वाढवण्यासाठी २०१५ मध्ये आण्विक करार करून देशावरील निर्बंधही शिथिल करून घेतले तसेच आपल्या आण्विक कार्यक्रमाला एकप्रकारे मान्यताही मिळविली. असे असले तरी भविष्यात इराणचे अण्वस्त्रधारी बनणे आम्हाला किंबहुना जागतिक शांततेला धोका ठरू शकतो, हा राग इस्रायल आणि अमेरिका हे देश पाहिजे तेव्हा आळवतात; तो त्यांनी पुन्हा आळवला आणि इराणवर युद्ध लादले. पण इराणच्या सज्जतेपुढे स्वतः अडचणीत येऊन जागाला वेठीस धरले आहे.

इराणने समोर आलेल्या साम्राज्यवादी आव्हानांना परतवून लावण्यासाठी दाखवलेला स्वावलंबन आणि प्रतिरोधाचा मार्ग इतरांसाठी मर्मभेदी ठरू शकतो. कोणत्याही देशाचा राष्ट्रवाद धगधगता ठेवायचा असेल तर जनसामन्यांची समज, बुद्धिवाद्यांची मतं आणि प्रभावशाली वर्गाची भूमिका एका निश्चित, विधायक मार्गाने कार्यन्वित होणे महत्त्वाचे असते. सद्यस्थितीत चालू असलेल्या युद्धाची आपल्याला विशेष झळ बसणार नाही म्हणून या युद्धाशी आपला काय संबंध? अशा अविर्भावात भारत राहू शकत नाही. २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याचे उद्दिष्ट आपण उराशी बाळगत असू तर, अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांची पर्वा न करता १९७४ व १९९८ च्या अणू चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण करणारा भारत आणि अमेरिकेने मंजूर केलेल्या सवलत काळातच इंधन खरेदी करणारा २०२६ चा भारत, ही तफावत का ? अमेरिकेकडून वारंवार उपसल्या जाणाऱ्या टॅरिफ अस्त्राला भारत काय उत्तर शोधणार आहे ? यावरच भारताच्या राष्ट्रवादी व्हिजन २०४७ चे यशापयश ठरणार आहे.

# महिलांनो भोंदूगिरी ओळखा, फसू नका

**अध्यात्मिक ज्ञानाच्या बुरख्याआडून स्वतःला ईश्वरी अंश भासवून भोळ्या भाबड्या महिलांचे लैंगिक शोषण करीत आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीचा हा महिलांसाठी हा एक कच्चा दुवा आहे. भारतीय संस्कृतीचे ते विकृत दर्शन होय. हा अत्याचार अनादी काळापासून जगभरातील महिलांवर होत आहे. ही फार मोठी शोकांतिका महिला जगतात आहे.**



महाराष्ट्रातील नाशिक येथील अशोक खरात या भोंदूबाबाने महिलांच्या केलेल्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणामुळे देशभरातील सर्व महिला हवालदिल झाल्या असून संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. शासनाने कडक कायदे करून या व अशा अस्तीनीतील सापांना वेळेवरच ठेचले तर महिला भगिनींची अब्रू राखली जाईल. शासनाने लाडकी बहीण आर्थिक मदती ऐवजी ‘‘लाडकी बहीण सुरक्षा मोहिम‘‘ आखली पाहिजे तरच महिलांची इज्जत राखली जाईल, तिची प्रतिष्ठा वाढीस लागेल.

श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धा पसरवून समाजातील लोकांना प्रगतीच्या मार्गातील गती अरोधक दूर करण्यासाठी जादुटोणा –भानामती– अघोरी कृत्ये– महिलांचे शोषण होऊ नये यासाठी महाराष्ट्र शासनाने कायदा करावा यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे दिवंगत अध्यक्ष नरेंद्र दाभोलकर यांनी आयुष्य झिजविले. त्यांच्यामुळे महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा झाला. पण त्यांना यासाठी प्राणाची आहुती द्यावी लागली. कांही सनातन व्यक्तींनी आपल्या व्यवसायातील अडसर दूर व्हावा यासाठी त्यांचा बळी घेतला. ही पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारी घटना आहे. नरेंद्र दाभोलकर यांच्या बलिदानानंतर सरकार खडबडून जागे झाले आणि विधिमंडळात कायदा मंजूर करून तो कायदा महाराष्ट्रात लागू केला. एवढे करूनही भोंदूबाबा, मंदिरातील मठपती, पुजारी, अध्यात्मिक धर्मगुरू, साधुसंत आपल्या अध्यात्मिक ज्ञानाच्या बुरख्याआडून स्वतःला ईश्वरी अंश भासवून भोळ्या भाबड्या महिलांचे लैंगिक शोषण करीत आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीचा हा महिलांसाठी हा एक कच्चा दुवा आहे. भारतीय संस्कृतीचे ते विकृत दर्शन होय. हा अत्याचार अनादी काळापासून जगभरातील महिलांवर होत आहे. ही फार मोठी शोकांतिका महिला जगतात आहे.

सामाजिक बंधनं मग ती जागतिक पातळीवरील कोणत्याही देशातील असोत, स्त्री ही भोगवस्तू आहे, असे संबोधले जाते आणि तिचे शोषण वेगवेगळ्या पातळीवर वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या पद्धतीने होत असल्याची उदाहरणे पहायला मिळतात. ही फार मोठी दु:खाची बाब आहे. यासाठी जगातील सर्वच शासनकर्त्यांनी एक शोध मोहिम आखून आपापल्या देशातील चर्च, पूजास्थाने, मठ, मंदिर, अध्यात्मिक साधू, गुरूंचे अड्डे शोधून काढून जेथे अशा प्रवृत्तींच्या लोक आढळून येतील त्यांच्यावर पोक्सो अतर्गत कायद्याचे कलम लावून द्रुतगती न्यायालयात खटला चालवून त्वरित फासावर लटकवले पाहिजे. तरच अशा प्रवृत्तींच्या लोकांना दहशत बसून त्यांचे काळे कारनामे बंद होतील.

इ.स. २०१३ ला आसाराम बापूला, २०१७ ला राम रहीम बाबाला याच कारणास्तव अटक झाली होती. हा इतिहास माहित असतांना भोळ्याभाबड्या महिलांचे डोळे कधी उघडणार हा पण मोठा यक्ष प्रश्न आहे. आता २०२६ मध्ये अशोक खरात या भोंदूबाबाने महिलांचे यौनशोषण केल्याबद्दल त्याला अटक झाली आहे. हा इतिहास ताजा असतानाच महिलांनी सुद्धा सजग होऊन अशा भोंदूबाबाचे मनसुबे लक्ष राहून ओळखले पाहिजे. अशा लोकांच्या नादी लागू नये. याचा बोध घेत आपल्या घरीच केवळ १० मिनिटेच मनोभावे पूजा अर्चा करावी. देवावर श्रद्धा ठेवा व सत्कर्म करा. मनाच्या वेगवेगळ्या कप्प्याच्या गर्तेत स्वतः: बुडवून घेऊ नका. हे सर्व थोतांड आहे हे लक्षात घेऊन वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगावा. अंधश्रद्धेला बळी पडून बळीचा बकरा बनू नका.महिला संघटनांनी दर वर्षी ८ मार्चला केवळ जागतिक महिला दिन मिरवण्यापुरता साजरा न करता समाजातील सर्वच स्तरातील महिलांना प्रबोधन करीत अंधश्रद्धेला बळी न पडता वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. मातृसत्ताक कुटुंबपद्धतीची पेरणी जगभर करावी. स्त्री प्रधान संस्कृतीचा प्रसार आणि प्रचार जगभर केला तरच यातून महिलांचा सन्मान वाढून स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता आहे, हे तत्व रूजवले जाईल. यामुळे स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळून त्यांची प्रतिष्ठा वाढेल आणि स्त्रियांची पिळवणूक व यौनशोषण थांबेल.

–सौ. गंगा भाऊ मोरे–भडके,
देगलूर मो. ९४२३३०५५५३

# ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करूनी म्हणती साधू।।

**भोंदूगिरी ही केवळ एका व्यक्तीची विकृती नसून ती समाजातील अंधश्रद्धा आणि अनामिक भीतीचा एकत्रित झालेला परिणाम आहे. कुठलाच बाईलवेडा बुवा बाबा तुमचं भलं करूच शकणार नाही याच भान समाजाला राहिलं नाही.**

सध्या स्थितीमध्ये लिंगपिसाट भोंदूबाबांच्या संख्येत प्रचंड वाढ होत आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये असे भोंदूबाबा देवऋषी बनून महिलांना लुटतात आणि आपल्या कुकर्माने प्रसिद्धीच्या झोतात येतात. व्याभिचारी, बलात्कारी आणि स्त्रियांचा अपमान करणारे हे स्वयंघोषित बाबा लोकांनी अक्षरशः उच्छाद मांडत आपल्या बाया–पोरींना नासवले आहे. एपस्टिन फाईल हे आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत असतांना नाशिकनंतर आता महाराष्ट्र राज्यात लोकल एपस्टिनची चर्चा गाजत आहे. मी संन्याशी आहे त्यामुळे लग्न करु शकत नाही म्हणत नाशिकनंतर नांदेडमध्ये मठातील महाराजाचा महिलेवर बलात्कार. मन सुन्न करणारी ही घटना ! खरं तर हा खरा धर्म नाही, हा धर्माच्या नावाखाली चालणारा घाणेरडा व्यवसाय आहे. या व्यवसायाला महिला मोठ्या प्रमाणात बळी पडत आहेत, ही खूप मोठी शोकांतिका आहे. या सर्व प्रकाराला जबाबदार कोण, अंश्रद्धा ? की आंधळी भक्ती ? याचे उत्तर शोधणे महत्वाचे आहे. खरं तर. ‘‘संन्यासाच्या वस्त्रातील छुपी वासना म्हणजेच ढोंग‘‘ यावर आपल्या महाराष्ट्रातील संत माहात्म्यांनी जनजागृतीसाठी वेळोवेळी ताशेरे ओढले आहेत. असे भोंदुबाबा जेव्हा कायद्याच्या कचाट्यात येतात तेव्हा ते आपल्या अंगी असलेल्या दैवी शक्तीला सिद्ध करु शकत नाहीत ? हीच वस्तुस्थिती आहे. त्यामुळे श्रद्धा असावी, पण अंधश्रद्धा बिल्कूलच नसावी ! दुर्दैवं याचं वाटत हा देश साधू संतांचा असतांना असले गलिच्छ प्रकार घडतातच कसे ?



एकविसाव्या शतकातील नीतीभ्रष्ट नागवा राम रहीम, आसारामबापू सारखा स्त्रीलपंट बलात्कारी सोबत प्रंचड भक्तप्रिय असलेली ‘‘राधे माँ‘‘ यांनी देखील काही काळ हौदोस मांडला होता. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत नारायण साई, रामपाल, निर्मल बाबा, सच्चिदानंद गिरी, ओम बाबा, इच्छाधारी भीमानंद बाबा ही नकली बाबा असलेली नाव सर्वांच्या परिचयाची आहेत आणि आता आधुनिक कॅप्टन खरात बाबा ! महाराष्ट्रातील अंधभक्तीमुळे अजून नवीन नवीन बाबा उदयन्मुख होतील यात शकांच ना ही.तसे पाहाता नकली भोंदूबाबांना संप्रदाय किंवा परंपरा नसते. त्यामुळे अशा ढोंगीबाबापासून सावध राहाणे हा एकमेव पर्याय आहे.

महाराष्ट्र हा पुरोगामी विचारसरणीचा देश आहे. फुले, शाहु, आंबेडकर या सारख्या प्रखर विचारवंतांची आज खरी आवश्यक्ता आहे. एवढे मात्र नक्की जिथे बुद्धी गुलाम असते तिथे विवेकाचे काही काम नसते. त्यामुळे भोंदूगिरी ही केवळ एका व्यक्तीची विकृती नसून ती समाजातील अंधश्रद्धा आणि अनामिक भीतीचा एकत्रित झालेला परिणाम आहे. कुठलाच बाईलवेडा बुवा बाबा तुमचं भलं करूच शकणार नाही याच भान समाजाला राहिलं नाही. कुठे होता महाराष्ट्र माझा ? आणि कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा ? खर तर महाराष्ट्रातील सर्व भोंदुबाबांना तडीपार करुन शासनाने कठोर भूमिका उचलायला हवी. नको भोंदूगिरी, घेऊ शिक्षणाची शिदोरी म्हणत, शासनाने महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा, जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियम २०१३ लागू केला आहे. सदर अधिनियमाबाबत माहिती जाणून घ्या, त्याचा अभ्यास करा आणि अश्या कोणत्याही अघोरी प्रथांना बळी पडू नका ! यातच आपले आणि समाजाचे हित आहे. ऐसे कैसे झाले भोंदू कर्म करूनी म्हणती साधू।। संत तुकारामांचा हा संदेश कीती दूरदृष्टीचा होता, हे या वरुन सिद्ध होते.

रुपाली वागरे–वैद्य (मो. ९८६०२७६२४१)

# बोगस विद्यापीठांचा विळखा

– प्रियंका शिंदे बोरुडे

‘शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे’ असे म्हटले जाते. परंतु आजच्या स्पर्धेच्या युगात हे दूध शुद्ध आहे की भेसळयुक्त, हे तपासण्याची वेळ आली आहे. आपण ज्या स्वप्नांच्या जोरावर भविष्याची इमारत उभी करू पाहतो, ती पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळणार असेल, तर दोष कुणाचा ?




‘शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे’, असे म्हटले जाते. परंतु आजच्या स्पर्धेच्या युगात हे दूध शुद्ध आहे की भेसळयुक्त, हे तपासण्याची वेळ आता विद्यार्थ्यांवर आली आहे. नुकत्याच हाती आलेल्या एका धक्कादायक बातमीने शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडवून दिली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालात देशातील तब्बल ३२ विद्यापीठे बोगस म्हणून घोषित केली आहेत. २०२४ मध्ये ही संख्या २० होती, ती अवघ्या दोन वर्षांमध्ये ३२ वर पोहोचली आहे. याचाच अर्थ, शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्या टोळ्या अधिक सक्रिय झाल्या आहेत. या यादीत देशाची राजधानी दिल्ली अव्वल क्रमांकावर आहे. तिथे तब्बल बारा विद्यापीठे बोगस आढळली आहेत. त्यापाठोपाठ उत्तर प्रदेशमध्ये चार तर महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, पश्चिम बंगाल आणि पुदुचेरी या राज्यांमध्ये प्रत्येकी दोन विद्यापीठे अनधिकृत ठरवण्यात आली आहेत. पुरोगामी आणि शैक्षणिक वारसा लाभलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्यातही दोन बोगस विद्यापीठे असणे, ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

अशा विद्यापीठातून पदवी घेतली असेल, तर त्याचे परिणाम विद्यार्थ्यांच्या संपूर्ण आयुष्यावर होऊ शकतात. सरकारी किंवा खाजगी क्षेत्रातील कोणत्याही नोकरीसाठी या पदव्या ग्राह्य धरल्या जात नाहीत. कागदपत्र पडताळणीत पदवी अवैध ठरल्यास नोकरी गमावण्याची वेळ येते. एम.बी.ए., एम.पी.एस.सी. किंवा परदेशात शिक्षणासाठी जायचे असल्यास या पदव्या कवडीमोलाच्या ठरतात. लाखो रुपयांची फी भरूनही हातात केवळ एक कागदाचा तुकडा येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण होते. प्रवेश घेण्यापूर्वी केवळ इमारतीची चकाकी किंवा जाहिरातींना बळी न पडता काही बाबी अवश्य तपासाव्यात. कोणत्याही विद्यापीठात प्रवेश घेण्यापूर्वी यूजीसी.एसी.इन या संकेतस्थळावर जाऊन बनावट विद्यापिठांची यादी तपासावी. एखादी वेबसाईट डॉटकॉम किंवा डॉटओआरजी आहे म्हणून अधिकृत ठरत नाही. सरकारी आणि अधिकृत विद्यापीठांच्या वेबसाईट शक्यतो एसी.इन किंवा एड्यु.इन या डोमेनवर असतात. हा सूक्ष्म फरक ओळखावा. विद्यापीठाकडे यूजीसीच्या कलम २(एफ) किंवा १२(बी) अंतर्गत मान्यता आहे का, याची खात्री करावी. विद्यापीठ कोणत्या कायद्यांतर्गत स्थापन झाले आहे (स्टेट ॲक्ट किंवा सेंट्रल ॲक्ट) याची माहिती मागावी. अनेक विद्यापीठे एका राज्यात स्थापन होऊन दुसऱ्या राज्यात बेकायदेशीर ऑफ कॅम्पस सेंटर्स चालवतात. ते वैध आहे का, हे विद्यार्थ्यांनी तपासावे. इंजिनिअरिंग किंवा मॅनेजमेंट अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यास एआयसीटीईची मान्यता आहे का हे तपासावे. विद्यापीठाचे नॅक मानांकन हे त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाणपत्र असते. तेही तपासणे गरजेचे असते.

विद्यापिठात प्रवेश घेताना विद्यापीठाचा पॅन कार्ड क्रमांक, जीएसटी नोंदणी आणि युजीसीच्या अधिकृत पत्राची प्रत मागण्याचा अधिकार प्रत्येक विद्यार्थ्याला असतो. पदवीची सत्यता तपासण्यासाठी सरकारने ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स आणि नॅशनल ॲकॅडमिक डिपॉझिटरी यासारख्या डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परदेशी विद्यापीठाची कोणतीही पदवी भारतात ग्राह्य धरण्यासाठी भारतीय विद्यापीठ संघाकडून समतुल्यता प्रमाणपत्र मिळवणे अनिवार्य असते. बोगस विद्यापीठे विद्यार्थ्यांना जाळ्यात ओढण्यासाठी विशिष्ट क्लृप्त्या वापरतात. अनेकदा नामांकित सरकारी विद्यापीठांच्या नावाशी मिळतेजुळते नाव ठेवून (उदा. दिल्ली विद्यापीठऐवजी दिल्ली स्टेट युनिव्हर्सिटी इ.) विद्यार्थ्यांची दिशाभूल केली जाते. ‘परीक्षा न देता पदवी’, ‘एका वर्षात पदवी’ किंवा ‘कामाचा अनुभव दाखवून पदवी’ अशी आमिषे दाखवली जातात. काही संस्था परदेशातील कोणत्याही अस्तित्वात नसलेल्या विद्यापीठाशी संलग्न असल्याचे भासवून महागड्या पदव्या विकतात. सोशल मीडिया, व्हॉट्स ॲप आणि आकर्षक वेबसाईटसच्या माध्यमातून बोगस विद्यापीठांची जाळी अधिक विस्तारली आहेत. अनेकदा घरबसल्या पदवी किंवा लाईफ एक्सपिरियन्स डिग्री अशा नावाखाली जाहिरातींचा भडिमार केला जातो. आजच्या स्पर्धात्मक जगात बॅक–डेटेड पदव्या देणाऱ्या टोळ्या सक्रिय आहेत.

सोशल मीडियावरील आकर्षक जाहिराती, प्रोफेशनल लुकिंग वेबसाईट्स आणि नामांकित व्यक्तींचे खोटे फोटो वापरून विद्यार्थ्यांची दिशाभूल केली जाते.आजकाल उच्च शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. पदवी म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नाही, तर ज्ञानाचे अधिष्ठान आहे. विद्यार्थ्यांनी शॉर्टकटच्या मागे न लागता अधिकृत विद्यापीठातूनच शिक्षण पूर्ण करावे. बोगस पदवीमुळे केवळ नोकरी जात नाही, तर भविष्यात फसवणुकीचा गुन्हाही दाखल होऊ शकतो. यूजीसी केवळ याद्या जाहीर करून थांबत नाही. युजीसी ॲक्ट, १९५६ नुसार, विनापरवाना युनिव्हर्सिटी हा शब्द वापरणे हा दखलपात्र गुन्हा आहे. अशा संस्थांवरफौजदारी गुन्हे दाखल होऊ शकतात आणि त्यांच्या पदव्या घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही भविष्यात कायदेशीर गुंतागुंतीला सामोरे जावे लागू शकते. पालक अनेकदा आपल्या पाल्याचे वर्ष वाया जाऊ नये म्हणून घाईघाईने एखाद्या विद्यापिठामध्ये प्रवेश घेतात. असे न करता पालकांनी काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. संस्थेची फी ही केवळ रोख स्वरूपात स्वीकारली जात असेल, तर अवश्य संशय घ्यावा. विद्यापीठाच्या जुन्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून तिथल्या पदवीचे बाहेरच्या जगातील मूल्य जाणून घ्यावे. कोणत्याही एजंट किंवा मध्यस्थाच्या माध्यमातून प्रवेश घेणे टाळावे. थेट विद्यापीठाच्या कार्यालयात जाऊनही चौकशी करता येऊ शकते. विद्यार्थ्यांचे आयुष्य म्हणजे केवळ एक रोल नंबर नसतो.

तो देशाचा आधारस्तंभ असतो. ३२ बोगस विद्यापीठांची समोर आलेली ताजी यादी म्हणजे एक धोक्याची घंटा आहे. सरकार आणि प्रशासन आपली जबाबदारी पार पाडेलच, पण विद्यार्थ्यांनीही स्वतः जागरूक राहणे ही काळाची गरज आहे. (लेखिका इंजिनियरिंग पोस्ट ग्रॅज्युएट आहेत.

अद्वैत फीचर्स)

# लेखकांना आवाहन

दैनिक सत्यप्रभासाठी विविध व प्रासंगिक विषयांवर लेख लिहून पाठवावेत. योग्य त्या लेखांना प्रसिद्धी देण्यात येईल. लेखकांनी आपला लेख युनिकोडमध्ये टाईप करून **dainiksatyaprabha2015@gmail.com** या मेलवर पाठवावेत.

**कार्यकारी संपादक**

सत्यप्रभा

हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२

**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**

**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**

या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.

https://epaper.esatyaprabha.com

र.क्रं. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०

e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### प्लास्टिकचा साठा जालन्यात जप्त

**जालना:** प्लास्टिकमुक्त शहर करण्यासाठी महानगरपालिकेने मोहीम अधिक तीव्र केली आहे. नवीन मोंढा परिसरात कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे १० क्विंटल प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिक जप्त केले आहे. संबंधित दुकानदारांकडून ३०,००० रुपयांचा दंड वसूल केला आहे. महानगरपालिकेच्या सर्व स्वच्छता निरीक्षकांनी एकत्रितपणे नवीन मोंढा बाजारपेठेत ही शोधमोहीम राबवली. काही प्रतिष्ठानांकडे प्रतिबंधित प्लास्टिकचा मोठा साठा आढळला.

### हॉटेलचालकांचा चुलीचा पर्याय

**बदनापूर :** शहरासह तालुक्यात हॉटेल व्यावसायिकांना सध्या गॅस सिलेंडरच्या टंचाईचा मोठा फटका बसत असून अनेकांनी पारंपरिक चुलीचा आधार घेत व्यवसाय सुरू ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. इराण-इस्राईल आणि अमेरिका यांच्यातील युद्धाचा हा परिणाम आहे. नागरिकांना घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा भासू नये, यासाठी शासनाने व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा तात्पुरता कमी करण्याचा निर्णय घेतल्याने हॉटेल व्यावसायिक अडचणीत सापडले आहेत.

### कृषी शास्त्रज्ञांकडून ज्वारीची पाहणी

**पूर्णा :** तालुक्यातील तरंगल शिवारात रब्बी हंगामात शेतकरी अनंत ढोणे यांनी सुमारे दोन एकर क्षेत्रात महाबीज बियाण्यांद्वारे ज्वारीची पेरणी केली होती. वाढ चांगली झाली असली तरी काही कणसांवर लांबकाणी व काळी गोसावी या रोगांचा प्रादुर्भाव झाला. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथील ज्वार संशोधन केंद्रातील वनस्पती विकृती तज्ज्ञ दरडे यांच्यासह अधिकाऱ्यांनी येथे भेट देऊन पिकाची पाहणी केली.

### धारदार शस्त्रांसह तिघांना अटक

**जालना :** अंबड पोलिसांनी दोन धारदार खंजीरसह तीन तरुणांना अटक केली आहे. शासकीय रुग्णालयाच्या परिसरात दहशत पसरवण्याच्या उद्देशाने हे तरुण वावरत असल्याचे समोर आले आहे. साहील शेख रईस (२३), हाफीज सलाम शेख (२५) आणि जावेद सिराज शेख (२३, सर्व रा. नाईकवाडी मोहल्ला, अंबड), अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याकडे दोन धारदार स्टीलचे खंजीर मिळून आले. ते जप्त करण्यात आले.

### मृतदेहाची ओळख, एआयद्वारे फोटो

**छत्रपती संभाजीनगर:** दौलताबाद पोलिस ठाणे हद्दीत आसेगाव शिवारात अज्ञात महिलेचा मृतदेह सापडला. या मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी पारंपरिक पद्धतीऐवजी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) या आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. मृत महिलेचा जीवंत भासणारा फोटो तयार केला आहे. अशा प्रकारे एआयच्या मदतीने ओळख पटवण्याचा हा जिल्ह्यातील बहुधा पहिलाच प्रयोग मानला जात आहे. यामुळे तिच्या नातेवाईकांचा शोध घेणे सोपे होणार आहे.

### उन्हाचा तडाखा, तापमानात वाढ

**छत्रपती संभाजीनगर:** उन्हाचा कडाका वाढल्याने शहरात उष्णतेची तीव्रता जाणवू लागली आहे. सलग दोन दिवस बरसलेल्या अवकाळी पावसानंतर तापमानात सातत्याने वाढ होत आहे. वाढत्या उन्हामुळे दुचाकीस्वार आणि पादचारी यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, अनेकांनी डोके व चेहरा झाकण्यासाठी रुमाल, टोपीचा आधार घेतल्याचे दिसून येत आहे.

---

### काळाबाजार रोखण्यासाठी संभाजीनगर येथे निर्णय

# गॅस एजन्सीवर सरकारी कर्मचारी

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

केंद्र व राज्य शासनाने मुबलक प्रमाणात गॅस उपलब्ध असल्याचे वारंवार सांगितल्यानंतरही शहरातील विविध गॅस वितरक एजन्सीबाहेरील नागरिकांच्या रांगा कमी होत नाहीत. घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार होत असल्याचा संशय आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तोडगा काढला असून शहरातील प्रत्येक गॅस एजन्सीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील लिपिक संवर्गातील एक कर्मचारी हा कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणार आहे. यामुळे गॅस वितरणात सुरळीतपणा येईल, अशी जिल्हा प्रशासनाची अपेक्षा आहे.

आखाती देशातील युद्धामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. घरगुती गॅसचा पुरवठाही विस्कळीत झाल्याने शहरातील गॅस एजन्सींवर टंचाई आणि अफवांमुळे ग्राहकांची गर्दी वाढतच आहे. बुकिंग केलेले हजारो ग्राहक वेटींगवर आहेत. त्यांच्या एजन्सीबाहेरील रांगा कमी होत नाहीत. त्यामुळे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शहरातील २३ गॅस एजन्सींवर महसूल विभागाचा प्रत्येकी एक लिपिक तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. हा कर्मचारी हा कार्यालयीन वेळेत एजन्सीवर उपस्थित राहील.

हा कर्मचारी नागरिकांच्या समस्या काय आहेत ? त्यांच्या मोबाईलवर ओटीपी येतो का? नाही आल्यास पर्यायी व्यवस्था काय आहे? ती व्यवस्था काम करते का? यांसह नियमानुसार गॅस सिलिंडर वितरित होते का? याची पाहणी करणार आहे.



#### एकाच वेळी २३ गॅस एजन्सींसमोर आंदोलन

युद्धामुळे निर्माण झालेली गॅस टंचाई आणि त्यामुळे फोफावलेला सिलिंडरचा काळाबाजार रोखण्याची मागणी करत शिवसेना उबाठा पक्षाने शुक्रवारी सकाळी ११ वाजता शहरातील २३ गॅस एजन्सींसमोर एकाचवेळी आंदोलन केले. जिल्हा प्रशासन आणि एजन्सींनी हा काळाबाजार रोखावा आणि नागरिकांची होणारी हेळसांड व आर्थिक पिळवणूक थांबवावी, अशी मागणी आंदोलनाद्वारे करण्यात आली. सिडको भागात मंगेश गॅस एजन्सी येथे शिवसेना नेते व माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात वीरभद्र गादगे, दिग्विजय शेरखाने, सुरेश कर्डिले, सीमा गवळी, विजया पवार यांनी आंदोलन केले.

#### तीन गॅस कंपन्यांचे साडे अकरा लाख ग्राहक

जिल्ह्यात ११ लाख ७७ हजार गॅस सिलिंडरधारक ग्राहक आहेत. यामध्ये एचपीसीएलचे दोन लाख ४० हजारापेक्षा अधिक तर बीपीसीएलचे तीन लाख ४० हजारापेक्षा अधिक आणि आयओसीएलचे तीन लाख ६० हजारांहून अधिक ग्राहक आहेत, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी दिली.

---

## आशिया कप तिरंदाजीत जालन्याच्या तेजलला पदक

### कांस्यपदक विजेत्या संघातील खेळाडू



प्रतिनिधी। **जालना**

बँकॉक (थायलंड) येथे सुरू असलेल्या आशिया कप तिरंदाजी (कंपाउंड उमेन्स कॅटेगरी) वर्ल्ड रँकिंग स्पर्धेत भारतीय महिलाने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक जिंकले. या संघातील तेजल राजेंद्र साळवे, चिकिथा तानिपार्थी आणि राज कौर यांनी उत्कृष्ट समन्वय आणि कौशल्याचे प्रदर्शन करत अंतिम फेरी गाठली. यांच्यापैकी तेजल साळवे ही जालना येथील आहे. त्यामुळे शहरात आनंद व्यक्त होत आहे.

संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने अचूकता, संयम आणि उत्कृष्ट संघभावना दाखवली. कठीण सामन्यांमध्येही त्यांनी स्थिर मनः स्थिती राखत प्रतिस्पर्ध्यांना जोरदार टक्कर दिली. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत तेजलने आपली अचूकता आणि मानसिक ताकदही दाखवून दिली. कांस्यपदकाच्या सामन्यात तिने प्रतिस्पर्ध्यावर नियंत्रण ठेवत महत्त्वाच्या क्षणी अचूक बाण सोडले आणि विजय आपल्या नावावर केला. तेजलच्या या यशामुळे भारताच्या तिरंदाजी क्षेत्रात पुन्हा एकदा अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

तेजलच्या या कामगिरीमुळे तरुण खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळणार आहे. तेजल राजेंद्र साळवे ही सातत्याने मेहनत, शिस्त आणि समर्पण यामुळे आज या उंचीवर पोहोचली आहे.

---

## कुत्र्याने केला बिबट्याचा सामना, शेतकरी बचावला

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

घोसला येथील एका शेतवस्तीवर झोपलेले शेतकरी ज्ञानेश्वर पाटील यांचे प्राण कुत्र्यामुळे वाचले. बिबट्या त्यांच्यावर हल्ला करणार त्याचवेळी सांडू नावाचा कुत्रा त्याच्यावर भुंकला. त्यामुळे बिबट्याने कुत्र्यावर हल्ला करून जखमी केले. कुत्र्याने बिबट्याला पळवून लावले.

आपल्या शेतातील पिकांच्या संरक्षणासाठी ज्ञानेश्वर पाटील हे रात्री वस्ती करून दररोज राखण करतात. त्यांनी भुईमूग व कांदा बियाणे पिकाची लागवड केली आहे. शेतशिवारात वीज पुरवठा नसल्यामुळे शेतकऱ्यांना



शेतराखण करण्याची मोठी अडचण निर्माण होत आहे. घोसला शिवारात शिवारात गेल्या बऱ्याच दिवसांपासून सिंगल फेज वीजपुरवठा बंद केलेला आहे. शेताची राखण करत असताना हिंस्र प्राण्यांपासून धोका आहे, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

---

## तर्कविहीन राजनीती विकासाला मारक : सीए प्रवीण पाटील

### नवज्योत फाउंडेशनचे विसावे संस्कार शिबिर

प्रतिनिधी। **नांदेड**

तर्कविहीन राजनीती विकासाला मारक असते, असे प्रतिपादन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष सीए प्रवीण पाटील यांनी केले. नवज्योत फौंडेशनच्या विसाव्या संस्कार शिबिरात उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर हुजूर साहीब आयटीआयचे प्राचार्य गुरुबचनसिंग शिलेदार, उद्योजक अलीभाई पंजवाणी, ॲड. चिरंजीलाल दागडिया, गुरुद्वारा बोर्डाचे माजी सचिव रवींद्रसिंग बुंगई, माजी न्यायाधीश परमजोत सिंग चाहेल, नवज्योत फाउंडेशनचे चेअरमन नौनिहालसिंग जागीरदार, प्रा. यशपाल भिंगे, कॉ. प्रदीप नागापूरकर, राहुल गोरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सीए प्रवीण पाटील म्हणाले की, सध्या सर्वत्र एआय तंत्रज्ञानाचा बोलबाला असून हे तंत्रज्ञान तारक आणि मारक आहे, मात्र हे तारक पेक्षा मारक चेच जास्त काम करत असल्याचे मला वाटते. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर करत असताना आपणास आवश्यक असलेल्या बाबीच यातून घेतल्या पाहिजेत. यावेळी सीए प्रवीण पाटील यांनी विद्यार्थ्यांना जात-पात, धर्म पाळू नये, असे आवाहन केले. जातीचा गर्व बाळगणे व्यर्थ असल्याचे त्यांनी सांगितले. धर्माच्या नावाचा जयजयकार करणारे सरकार सध्या सत्तेत असून या सरकारला आता गॅस डिझेल पेट्रोल साठी इराणकडे हात पसरावे लागत असल्याचेही यावेळी ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलप्रकाश सिंह लिखारी यांनी केले. प्रास्ताविक नवज्योत सिंग जागीरदार यांनी केले तर आभार सज्जनसिंग सिद्धू यांनी मानले. यावेळी योगशिक्षक विलास पाटील यांनी योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. या शिबिरात एक हजारपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

#### या वक्त्यांनी केले विद्यार्थ्यांचे प्रबोधन

या शिबिरात सकाळच्या सत्रात सौ. अनुजा डोईफोडे यांनी सामाजिक सदभावना या विषयावर अतिशय सुंदर व्याख्यान दिले. यावेळी त्यांनी समाजामध्ये सदभावना निर्माण करणाऱ्या महनीय व्यक्ती आणि संस्थांबद्दल माहिती दिली. जिथे माणुसकी मजबूत आहे, तेथील समाज मजबूत आहे आणि जेथील समाज मजबूत आहे ते राष्ट्र



मजबूत आहे हा संदेश देऊन त्यांनी आपल्या व्याख्यानाचा समारोप केला. आपल्या व्याख्यानात त्यांनी अहमदनगर येथील स्नेहालय, नांदेडच्या नेरलीचे कुष्ठधाम यासह अन्य समाजोपयोगी संस्थाच्या कार्याचा गौरव केला. तर गुरुगोविंद सिंगजी, गुरुतेग बहादूरजी, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, मदर टेरेसा, एपीजे अब्दुल कलाम यांच्यापासून ते बनारसीदास अग्रवाल, धर्मभूषण दिलीप ठाकूर या धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या समाजसेवकांचा आढावा घेतला.

---

## मतदार यादी पुर्निरीक्षणात हलगर्जीपणा भोवला ; बीएलओविरुद्ध गुन्हा दाखल

### कर्तव्यात कसूर करणाऱ्यांना तहसील प्रशासनाचा इशारा

प्रतिनिधी। **परभणी**

मतदार यादी सखोल पुर्निरीक्षण (एसआयआर) मोहिमेदरम्यान निवडणूक कर्तव्यात हलगर्जीपणा करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याविरुद्ध (बीएलओ) तहसील प्रशासनाने कडक कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेतील शिस्त व जबाबदारीबाबत प्रशासनाचा कठोर संदेश अधोरेखित झाला आहे.

मतदार यादीतील नावांचे अचूक मॅपिंग करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. २००२ मधील मतदार यादीतील नोंदींचे २०२४ च्या अद्ययावत यादीशी तंतोतंत जुळवाजुळव करणे ही या मोहिमेची मुख्य जबाबदारी आहे. मात्र, या संवेदनशील प्रक्रियेत नियुक्त करण्यात आलेले डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम शाळेतील शिक्षक सय्यद फरहान सय्यद रहीम बीएलओने आपल्या कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याचे समोर आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित शिक्षकास मतदान केंद्र क्र. ९६/२२२ वर बी.एल.ओ. म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यांनी १३ मार्च रोजी कर्तव्य स्वीकारले, मात्र त्यानंतर त्यांनी प्रत्यक्षात कोणतेही काम न करता निवडणूक विभागाच्या सूचनांकडे दुर्लक्ष केले. विभागाकडून वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. काही वेळा त्यांचा मोबाईल बंद असल्याचेही आढळून आले.

या प्रकारामुळे मतदार यादी पुनरीक्षणाच्या महत्त्वाच्या कामात अडथळा निर्माण झाला असून संबंधित मतदान केंद्रातील मतदारांच्या नोंदींच्या अचूकतेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



#### वरिष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन भोवले

ही बाब गंभीर स्वरूपाची मानत नायब तहसीलदार (निवडणूक) सुनील कांबळे यांनी तातडीने संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली. लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० च्या कलम १३४ अन्वये संबंधित बी.एल.ओ. विरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक कर्तव्यातील ही निष्काळजीपणा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन मानून प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे.

---

## तहानलेल्यांना नाल्यालगतच्या विहिरींचे पाणी

# छत्रपती संभाजीनगरमधील प्रकार, दूषित पाण्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

महापालिकेकडून अनियमित व अपुरा पाणीपुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना खासगी टँकर मागवाले लागत आहेत. मात्र टँकरचालक नाल्यालगतच्या विहिरींचे दूषित पाणी नागरिकांना देत असल्याने रोगराईचा धोका वाढला आहे. शहरातील प्रतापनगर, उस्मानपुरा, जवाहरनगर, पन्नालालनगर भागातील नाल्यालगतच्या विहिरीतील दूषित पाणी टँकरमध्ये भरून ते नागरिकांना पुरविले जात आहे.

उन्हाळा सुरू होताच शहरवासीयांकडून पाण्याच्या मागणीत वाढ झाली आहे. महापालिकेकडून शहरातील काही वसाहतींना सहा ते सात दिवसांआड तर काही भागांना आठ ते नऊ दिवसांनी पाणीपुरवठा केला जातो. त्यातच जलवाहिनीत बिघाड झाल्यास पाण्याचे टप्पे पुढे ढकलण्यात येतात. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. महापालिकेच्या अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना खासगी टँकरद्वारे पाणी घ्यावे लागते. मात्र टँकरचालक हे पाणी भरण्यासाठी अधिकृत जलस्रोतांचा वापर न करता नाल्यालगतच्या साठ्यांचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

उस्मानपुरा, जवाहरनगर, पन्नालालनगर परिसरात नाल्यालगत असलेल्या विहिरींमधून टँकरचालक पाणी भरत आहेत. या विहिरींमध्ये नाल्यातील सांडपाणी आणि घाण मिसळल्यामुळे दूषित झाले आहे. या भागातून दररोज ८० ते १०० टँकर भरले जात आहेत. येथून हे पाणी उस्मानपुरा, एकनाथनगर, उल्कानगरी, गारखेडा परिसर, शिवाजीनगर परिसरासह काही लगतच्या भागांमध्येही पोहोचवले जात आहे.

या दूषित पाण्यामुळे पोटाचे विकार, त्वचारोग व इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे. पाण्यासोबत आजारही विकत घ्यावे लागत असल्याची वेळ महापालिकेच्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे आली असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.



#### नागरिकांना दुहेरी आर्थिक भुर्दंड

टँकरचे दरही गगनाला भिडले आहेत. दोन हजार लिटर पाण्यासाठी सुमारे ७०० रुपये, तर पाच हजार लिटर टँकरसाठी १२०० ते १५०० रुपये मोजावे लागत आहेत. एका बाजूला पाणीपट्टी भरूनही नियमित पाणी मिळत नसताना, दुसऱ्या बाजूला दूषित पाण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागत असल्याने नागरिकांना दुहेरी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून, आरोग्याचा धोकाही पत्करावा लागत आहे.

---

**एकजूट** | महाराष्ट्र ग्रामीण बँक निवृत्त कर्मचारी संघटनेचे संभाजीनगरात आंदोलन

# निवृत्त बँक कर्मचाऱ्यांचा मागण्यांसाठी एल्गार

प्रतिनिधी। **नांदेड**

महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे अनेक प्रलंबित लाभ दीर्घकाळापासून बँकेने अडवून ठेवलेले आहेत. त्या निमित्ताने सेवानिवृत्तांच्या संघटनेकडून छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य कार्यालयासमोर एक दिवसाचे धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महाराष्ट्रातून १५० पेक्षा जास्त निवृत्त कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

बँकेमधील अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांचे वय आज ७० ते ८० च्या दरम्यान आहे. अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या न्याय्य मागण्यासाठी आंदोलन करावे लागते हे व्यवस्थापनाचे अपयश म्हणावे लागेल. अगदी थातूर मातूर कारणासाठी बँकेने आर्थिक लाभ प्रलंबित ठेवलेले आहेत. केंद्र सरकारच्या सूचना असताना देखील त्या जशाच्या तशा न राबविता फाटे फोडण्यात येतात, अशा भावना यावेळी व्यक्त झाल्या. आंदोलनाच्या सुरुवातीला विश्वकर्मा यांच्या फोटोस भारतीय मजदूर संघाचे जिल्हा चिटणीस धनंजय वझुरकर आणि मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. सत्येंद्र चौधरी हरिभक्त परायण जानकीराम घाटूळ आणि नागेश देशमुख यांनी श्रमिक गीत सादर करून आंदोलनाची सुरुवात केली. संघटनेचे अध्यक्ष सुदर्शन पांडागळे यांनी प्रास्ताविक करताना विविध प्रलंबित मागण्यांचा आढावा घेवून त्याकडे व्यवस्थापन कसे डोळे झाक करत आहे आणि प्रत्येक मिटिंगमध्ये फक्त आश्वासन देत आहेत, यावर प्रकाश टाकला.

धनंजय वझरकर यांनी मागण्यांचा आढावा घेतला आणि व्यवस्थापनाने यावर विचार केला नाही तर छत्रपती संभाजीनगर मधील विविध कार्यालयांमध्ये कार्यरत भारतीय मजदूर संघाच्या सर्व संघटना या ठिकाणी आंदोलन छेडतील, असा इशारा दिला. ज्येष्ठ सभासद राम कपाळे, गणेश पांडे, प्रमोद आंबेकर, लहू खंडेलोटे, यशवंत कवडे, लक्ष्मण पवार, विजय जोशी, भानुदास गिरे, उज्ज्वला साकळकर, वसुधा देव, गंभीरराव देशमुख आदींनी व्यवस्थापनाचा समाचार घेतला. यावेळी घोषणांनी बँकेचा संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

आंदोलनाची सांगता जानकीराम घाटूळ यांच्या पसायदानाने करण्यात आली. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी किशोर सावरगावकर, कौतिक वाघ, रमेश सातपुते, दिलीप कड, अशोक गायकवाड, नागेश देशमुख, मोहन गावंडे यांनी परिश्रम घेतले. आंदोलनाची आखणी करून ते व्यवस्थित पार पाडण्याचे नियोजन कार्याध्यक्ष देशमुख यांनी केले.

#### व्यवस्थापनाने स्वीकारले आंदोलनस्थळी निवेदन

जोरदार अंदोलनामुळे व्यवस्थापनाला आंदोलनस्थळी येऊन निवेदन स्वीकारावे लागले. बँकेच्यावतीने मुख्य सरव्यवस्थापक दत्तात्रय कावेरी, सहाय्यक सरव्यवस्थापक बाळासाहेब घोगरे यांनी मागण्याचे निवेदन स्वीकारले. एक महिन्याच्या आत मागण्या सोडविण्यात येतील, असे आश्वासन यावेळी व्यवस्थापनाकडून देण्यात आले.

#### मुदतीत निर्णय न झाल्यास पुणे, मुंबईत आंदोलन

सरचिटणीस राम दुगाळे यांनी आंदोलक सभासदांनी सक्रिय सहभाग नोंदविल्याबद्दल आभार व्यक्त केले. त्याचवेळी एक महिन्याच्या आत मागण्या सोडविल्या गेल्या नाही तर बँक ऑफ महाराष्ट्र पुणे आणि नाबार्डच्या मुंबई कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला.

---

## १८ तोळे सोने घेऊन बंगाली कारागीर पसार

### दिवाळीचे कारण सांगून वेळकाढूपणा

प्रतिनिधी। **छत्रपती संभाजीनगर**

एका बंगाली कारागिराने शहरातील व्यापारी आणि सराफांचे तब्बल १८ तोळे सोने घेऊन पोबारा केला. हा प्रकार जुना बाजार भागात उघडकीस आला. मेघनाथ बिमल रॉय (वय ४१, रा. हुगळी, पश्चिम बंगाल) असे आरोपीचे नाव आहे. तो कुटुंबासह निघून गेला आहे.

फिर्यादी अब्दुल लतीफ अब्दुल कादर (रा. जुनाबाजार) यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्याच मालकीच्या घरात मागील १३ वर्षांपासून मेघनाथ हा कारागीर भाड्याने राहत होता. त्याचा विश्वास संपादन झाल्यामुळे फिर्यादीने सप्टेंबर २०२५ मध्ये त्याला ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (कडा व अंगठी) नेकलेस बनवण्यासाठी दिले होते. केवळ फिर्यादीच नव्हे तर आरोपीने शहरातील इतर नामांकित सराफांनाही गंडा घातला आहे.

उदय सराफ यांच्याकडून दागिने बनवण्यासाठी आणि दुरुस्तीसाठी घेतलेले सुमारे ५९ ग्रॅम ५०० मिली शुद्ध सोने, के.एम. गोल्ड (शेख कदीर) यांच्याकडून ग्राहकांना देण्यासाठी नेलेले ३६ ग्रॅमचे सोन्याचे झुमके आणि २१ ग्रॅम ६०० मिलीच्या सोन्याच्या वाटी असा ऐवज त्याने लंपास केला. दिवाळीच्या हंगामाचे कारण सांगून आरोपीने वेळकाढूपणा केला.

३१ ऑक्टोबर २०२५ रोजी फिर्यादी त्याच्या घरी गेले असता, घराचा दरवाजा उघडा होता मात्र आरोपी कुटुंबासह आणि दुकानातील साहित्यासह गायब झाला होता.

## संक्षिप्त

### सोन्याची चैन पळविली

**नांदेड –** डॉक्टर लाईन वजिराबाद येथे गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी गोविंद मुन्नालाल परीवाले (रा. गोकुळनगर) यांच्या गळ्यातील एक लाख ८४ हजार ४७५ रुपये किंमतीची सोन्याची चैन चोरून नेली आहे. गोविंद परिवाले यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेचा पुढील तपास पोहेकॉ. एमेकर हे करत आहेत.

### तीन ब्रास रेतीची चोरी;गुन्हा दाखल

**नांदेड –**गुरुद्वारा गेट क्रमांक तीन येथे पोकॉ. संतोष तुळशीराम पोकले यांनी बेकायदेशीर रेतीची वाहतूक करणारा टिप्पर (एमएच-२६, एडी-४४२७) पकडला. टिप्परसह १५ हजार रुपये किंमतीची तीन ब्रास रेती जप्त करून आरोपी पुण्यजीत वामनराव तारू (वय २१, रा. बळीरामपूर) याच्याविरुद्ध वजिराबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून या घटनेचा पुढील तपास पोहेकॉ. गव्हाणकर हे करत आहेत.

### पुंडलिक तरटे यांचे निधन



**बिलोली –** तालुक्यातील केरूर येथील पुंडलिक मरिबा तरटे वय ७० यांचे दि.२८ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी दि.२९ केरूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### माधवराव सोळंके यांचे निधन



**भोकर –** तालुक्यातील पोमनाळा येथील रहिवासी माधवराव दशरथ सोळंके वय ८० यांचे शनिवार दि.२८ मार्च सकाळी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर दुपारी पोमनाळा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले .त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले,मुलगी ,सुना नातवंडे आसा परिवार आहे.

कामठा जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

# ४१ जणांविरुद्ध कारवाई, ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । **नांदेड**

नांदेड शहरा नजीक गाडेगाव रोडवरील कामठा गावात जुगार अड्डा सुरू असल्याची माहिती पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांना खबर हेल्पलाइन वरून प्राप्त झाल्याने, त्यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांचे एक पथक रवाना केले होते. त्यांनी सदर ठिकाणी जावून ४१ जणांविरुद्ध काराई करत ११ लाख रुपयांचा मुद्देमालही जप्त केला आहे. २७ माच रोजी ही कारवाई करण्यात आली.

गाडेगाव रोडवरील कामठा परिसरात जगनलाल देविलाल यादव यांच्या मालकीच्या जागेत एका टिन शेडमध्ये बेकायदेशीरपणे पपलू नावाचा जुगार खळला जात होता. याची गोपनीय माहिती पोलिस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी तत्काळ पोलिस अधिकारी अंमलदारांचे पथक तेथे पाठवले. सदर पथकाने ४१ व्यक्तिंना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून एक लाख ५० हजार ९५० रुपयांची रोख रक्कम, ३७ मोबाईल व १२ दुचाकी असा एकूण ११ लाख ४७ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सर्व आरोपींविरुद्ध विमानतळ पोलिस ठाण्यात गुरनं ११२/२०२६ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तपास सपोनि संतोष जोंधळे करत आहेत.



### जुगाऱ्यांना प्रशिक्षण देणारे केंद्र

उपलब्ध कागदपत्रांप्रमाणे, कामठा येथील सदर जुगार अड्ड्यावर जुगाऱ्यांना जुगार खेळण्याचे प्रशिक्षण देण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्र हे राज कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, चिंचवडगांव ( ता. वडवणी, जि. बीड) यांचे मार्फत चालविण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात विशेष पथकाने केलेल्या कारवाईत, येथील जुगार अड्ड्यावर ४१ आरोपी, पपलू नावाचा जुगार खेळत असल्याचे आढळून आले. चिंचवडगाव येथील सदर क्रीडा व सांस्कृतिक मंडळांने परिक्षेत्रात अनेक ठिकाणी, अशा प्रकारची जुगार प्रशिक्षण केंद्रे सुरू केल्याची माहिती असून, यापूर्वी परभणी जिल्ह्यातील लिमला, व मर्डसगाव येथील प्रशिक्षण केंद्रांवर धाड टाकून, विशेष पथकाने अनेक जुगाऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांचे विरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

### पथकाला १० हजार रुपयांचे बक्षिस जाहीर

सदर कारवाई बद्दल पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, संजीव जिंकलवाड, पोकॉ गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांचा सहभाग होता. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून, त्यांना दहा हजार रुपयांचे बक्षीस घोषित करून, प्रोत्साहित केले आहे.पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध धंदे चालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.यानंतही सातत्याने मोहिम राबवावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# मनपा सभापती सदिच्छा सोनी यांनी शाळांना अचानक भेटी देऊन सुविधांची केली पाहणी



प्रतिनिधी । **नांदेड**

महानगरपालिकेतील शिक्षण, आरोग्य व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ.सदिच्छा सोनी पाटील यांनी पदभार स्वीकारताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे.

पहिल्याच दिवशी त्यांनी देगलूर नाका परिसरातील हैदरबाग येथील दवाखान्याला अचानक भेट देत तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर मार्च महिन्याच्या अखेरीस त्यांनी महापालिकेच्या शाळांकडे विशेष लक्ष केंद्रित करत अचानक भेटी देऊन तेथील सुविधांची पाहणी सुरू केली आहे. या भेटीत

त्यांनी मुख्याध्यापकांशी संवाद साधून शाळांतील समस्या व गरजांची अचूक नोंद घेऊन त्या सोडवण्याची ठाम भूमिका व्यक्त केली.

सभापती पाटील यांनी स्पष्ट केले की, शाळांमध्ये डिजिटल शिक्षण व ई-लर्निंगसारख्या आधुनिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून केली जाईल. शाळांची गुणवत्ता, उपस्थिती आणि निकाल यावर बारकाईने लक्ष ठेवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी ठोस उपाययोजना राबवण्यात येतील. शिक्षकांची उपस्थिती, कामगिरी व शिस्त यांचे परीक्षण करून शिक्षण व्यवस्थेत अधिक शिस्त आणि परिणामकारकता आणली जाईल. तसेच निकाल सुधारण्यासाठी विशेष योजना आखण्यात येणार असून, कमी दर्जाच्या शाळांसाठी उपाययोजना केल्या जातील. याचबरोबर स्पर्धा परीक्षा व कौशल्य विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि स्पर्धात्मकता वाढवण्यावर भर दिला जाईल.

शाळांच्या दुरुस्ती, पाणी, स्वच्छता, वर्गखोल्या अशा मूलभूत सुविधांच्या उन्नतीसाठी निधी प्रस्तावित करून समस्या दूर करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तके, गणवेश आणि मध्यान्ह भोजन योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित केली जाईल. विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहनपर योजना राबवण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# बदल हा मानवतेचा मूलस्त्रोत : सुखमणी



प्रतिनिधी ।**नांदेड**

निसर्ग आणि परिस्थितीनुसार बदल हा मानवतेचा पहिला मूलस्त्रोत आहे, असे प्रेरणादायी उद्गार २० वर्षीय स.जसविंदर सिंग सुखमनी यांनी नवज्योत फाउंडेशनच्या २० व्या संस्कार शिबिरात काढले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, व्यक्तीने आपल्या विचारांवर ठाम राहून योग्य बदल स्वीकारणे आवश्यक आहे. गौतम बुद्ध यांच्या शांततेच्या संदेशाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, समाजातील वाईट गोष्टींपासून दूर राहून चांगल्या गोष्टी आत्मसात करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपल्या मनातील गर्व, क्रोध यांसारख्या नकारात्मक भावना दूर करून प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी वाढवणे हेच खरे परिवर्तन आहे.

तसेच बदल घडवायचा असेल, तर सर्वप्रथम स्वतःमध्ये बदल घडवणे गरजेचे आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची सवय लावण्याचा सल्ला दिला. भगतसिंग यांचे उदाहरण देत त्यांनी स्पष्ट केले की, योग्य प्रश्न विचारूनच त्यांनी तत्कालीन इंग्रज सत्तेला आव्हान दिले. मात्र आजच्या समाजात प्रश्न विचारण्याची वृत्ती कमी होत चालली असून, ही चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

धर्म आणि जातीच्या नावावर होणारे वाद टाळणे हे मानवतेचे पहिले सूत्र असल्याचे सांगत त्यांनी समाजात सहानुभूती आणि एकात्मता जपण्याचे आवाहन केले. केवळ स्वतःचा विचार न करता समाजहिताचा विचार करणे आणि सामाजिक मूल्ये जपणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

# आई हीच पहिली गुरु :सुनिता बजाज

प्रतिनिधी । **नांदेड**

''आई ही आपल्या जीवनातील पहिली गुरु असून तिचे स्थान अनन्यसाधारण आहे. मुलासाठी सर्वस्व अर्पण करणारी एकमेव व्यक्ती म्हणजे आई,'' असे प्रतिपादन सुनिता बजाज यांनी केले.

नवज्योत फाउंडेशनतर्फे आयोजित कुसुम सभागृहात ''माँ की ममता'' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी नवज्योत फाउंडेशनचे पदाधिकारी व विविध शाळांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, प्रत्येक घरात ईश्वराचे अस्तित्व ठेवणे शक्य नसल्यामुळे ईश्वराने आईच्या रूपात प्रत्येक घरात आपली उपस्थिती निर्माण केली आहे. जगातील कोणत्याही वस्तू किंवा संपत्तीपेक्षा आपल्या संततीवर अधिक प्रेम करणारी व्यक्ती म्हणजे आई असून, तिचे महत्त्व जीवनात अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात शरद झरे यांनी मोबाईलच्या वाढत्या वापरावर प्रकाश टाकला. बदलत्या जीवनशैलीत मोबाईलच्या अतिरेकामुळे विविध आजार वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः १ ते १० वयोगटातील मुलांनी मोबाईलचा वापर टाळावा, तसेच प्रौढांनीही दिवसाला दोन तासांपेक्षा अधिक मोबाईल वापर करू नये, असे आवाहन त्यांनी केले.मोबाईलचा डोळ्यांवर होणारा दुष्परिणाम सांगताना त्यांनी त्यावरील उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले तसेच डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त आहाराचेही विश्लेषण केले.

### कल्याण नावाच्या जुगारावर छापा

प्रतिनिधी ।**नांदेड**

खडकपुरा पुल ते मस्जीद कमानीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बेकायदेशीर कल्याण नावाचा जुगार खेळवला जात होता. याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोकॉ. शेख उमर शेख रज्जाक यांनी छापा टाकून रोख दोन हजार २८० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. आरोपी राहुल अजय बनसोडे (वय २३, रा. कलामंदिर) याच्याविरुद्ध वजिराबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोहेकॉ. नंदे पुढील तपास करत आहेत.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत माजी आ.शंकरअण्णा धोंडगे यांचा शिवसेनेत प्रवेश

प्रतिनिधी । **नांदेड**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत लोहा येथे रविवारी (दि.२९) सायंकाळी राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून शेतकरी नेते तथा माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.



लोहा येथील बैल बाजार मैदान येथे शेतकरी नेते तथा माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांच्यावतीने रविवारी सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशनाला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख नेते एकनाथ शिंदे हे मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री संजय शिरसाठ, माजी मंत्री तथा शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख सिद्धाराम म्हेत्रे,आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ.आनंद बोंढारकर,आ.संतोष बांगर, आ.बाबुराव कदम कोहळीकर, शिवसेना प्रवक्ता खा. ज्योती वाघमारे, माजी आ.शहाजीबापू पाटील आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तसेच यावेळी माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश सोहळा होणार आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या शेतकरी अधिवेशनाला संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जि. प.चे माजी उपाध्यक्ष दिलीप धोंडगे आणि शिवराज धोंडगे यांनी केले आहे.

